www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ३७ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, गुरुवार, १३ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### डम्परच्या धडकेत क्राईम ब्रांचच्या पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू, अपघातात एका महिलेचाही सामावेश

● ठाणे,रोहित जैसवाल :

वर्तकनगर येथील कोरस भागात ठाणे क्राईम ब्रांचचे पोलीस कॉन्स्टेबल सुनील रावते (४४) यांच्या अंगावरून डम्पर गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. तर, त्यांच्या सोबत दुचाकी चालविणाऱ्या महिलेचाही मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद वर्तकनगर पोलीस ठाण्यात करण्यात येत आहे. वर्तकनगर भागात सुनील रावते हे कार्यरत आहेत. ते ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या वागळे युनीटमध्ये कार्यरत होते. बुधवारी सकाळी ते एका महिलेच्या दुचाकीवरून खासगी कामासाठी जात होते. त्याचवेळी डम्परच्या चाकाखाली आल्याने रावते आणि त्यांच्यासोबत असलेल्या महिलेचा मृत्यू झाला. अपघात नेमका कसा झाला आहे हे अद्याप कळू शकले नाही. अपघाताची नोंद वर्तकनगर पोलीस ठाण्यात करण्यात येत आहे. दोघांचेही मृतदेह जिल्हा शासकीय रुग्णालयात ठेवण्यात आले आहे. सुनील रावते यांच्या पश्चात त्यांची पत्नी आणि मुले आहेत. त्यांच्या मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे.

# “हे माझं शेवटचं उपोषण, आता थेट विधानसभेच्या तयारीला लागणार”

## मनोज जरांगेंचा सरकारला इशारा !

● ठाणे, यश सावंत :



मराठा आरक्षणासाठी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा उपोषण छेडलं आहे. अंतरवाली सराटीत त्यांनी उपोषणाला सुरुवात केली असून ते आपल्या मागणीवर ठाम आहेत. त्यातच, त्यांनी आता मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीवर (ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी) आरोप केले आहेत. त्यांनी दिल्लीत जाऊन षडयंत्र रचल्याचे ते म्हणाले आहेत. तसंच, हे माझं आता शेवटचं उपोषण असल्याचंही ते म्हणाले. मनोज जरांगे पाटील म्हणाले, “ओबीसी नेते समजून घेत नाहीत. ओबीसींच्या आरक्षणाला कोणताही धक्का लागत नाही. ते उगीच तेढ निर्माण करत आहेत. काहीजण इथं प्रसिद्धीसाठी बसले आहेत. जिकडे मराठे आंदोलन करत आहेत, तिथंच त्यांनाही करायंच आहे. त्यांना जातीय तेढ निर्माण करायचा आहे. आणि आम्हाला जातीयवादी म्हणत आहेत.” “हे सरकारचं जाणूनबुजून षडयंत्र आहे. आम्ही मुख्यमंत्र्यांना चांगलं समजत होतो. यापुढेही चांगलं समजत आहोत. आम्हाला कळतं सगळं. कोणाच्या गाड्या येत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या ओसडीने काय षडयंत्र रचले आहेत. काय डाव रचला आहे. हसून खेळून गोड बोलतील आणि कार्यक्रम प्रत्येकवेळी मराठ्यांचा लावतील”, असाही आरोप त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीवर केला आहे. तसंच ते मराठ्यांच्या अन्नात तेल ओतत असल्याचंही जरांगे पाटील म्हणाले. “षडयंत्र रचून दिल्लीपर्यंत न्यायला लागले आहेत. कोण कुठे जातो, कोण कुठे उतरतो. विमानतळावर कोणाच्या गाड्या आहेत.

पान २ वर

# रत्नागिरीतील मिऱ्या बंधाऱ्याचे काम सुरू न झाल्याने ग्रामस्थांनी घेतली पतन अधिकाऱ्यांची भेट

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :

दरवर्षी पावसाळयात मिऱ्यावासीयांच्या डोक्यावर उधाणाची भीती असते. त्यामुळे बंधाऱ्यासाठी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला जात होता. मात्र, निधी मिळूनही मिऱ्या बंधाऱ्याच्या धोकादायक टप्प्याचे काम पावसाळा लागल्यावरही सुरू न झाल्यामुळे मिऱ्या ग्रामस्थांनी पत्तन विभागावर धडक देत गावचे संरक्षण करण्यासाठी बंधाऱ्याचे काम करण्याची मागणी केली. यावेळी पत्तन अधिकाऱ्यांनी यावर लवकरच तोडगा काढू, असे आश्वासन ग्रामस्थांना दिले.

मिऱ्या बंधाऱ्याचा पांढरा समुद्र ते जयहिंद चौकापर्यंतचा अडीचशे मीटरचा टप्पा अपूर्ण आहे. सध्या पावसाळा सुरू झाल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिऱ्या धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे साडेतीन किलोमीटरचे



काम करण्यात येणार आहे. मरीन ड्राइव्हच्या धर्तीवर हा पक्का बंधारा बांधण्यात येत आहे. साडेतीन किलोमीटरपैकी अडीचशे मीटरचे काम शिल्लक आहे.पत्तन विभागाने केलेल्या सर्वेक्षणामधील सात धोकादायक क्षेत्रांपैकी हे एक क्षेत्र आहे. समुद्राचा प्रवाह बदलला असल्यामुळे या भागात उधाणाच्या लाटांचा मोठा मारा बसतो.

पान २ वर

# तज्ज्ञ व्यक्तींच्या शिफारशीनुसार या वर्षीपासून विद्यार्थ्यांना तीनस्तरीय पोषण आहार दिला जाणार

● कोल्हापूर, विशाल पाटील :

व्हेजिटेबल पुलाव, अंडा पुलाव, मटार पुलाव, मूगडाळ खिचडी, गोड खिचडी, नाचणीचे सत्त्व, मोड आलेले कडधान्य, मसुरी पुलाव आणि केळी किंवा स्थानिक फळ... ही नावे वाचून हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलेल्या ग्राहकांनी मागावलेल्या अन्नपदार्थांची यादी असेल असे वाटेल. पण राज्य शासनाने शालेय पोषण आहारासाठी शाळांना सुचवलेल्या पदार्थांची. केवळ खिचडी, वरण-भात, उसळ भात अशा मर्यादित खाद्यापदार्थांऐवजी यंदापासून १५ लज्जतदार पदार्थांची चव ८६ हजार ५०० शाळांमधील १ कोटी ३ लाख विद्यार्थ्यांना चाखता येणार असल्याने त्यांची ज्ञानाच्या जोडीनेच अन्नाची गोडी वाढणार



आहे. या योजनेमध्ये स्थानिक अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. राज्याच्या शिक्षण विभागाने याबाबतचे नवे धोरण नुकतेच जाहीर केले आहे. तज्ज्ञ व्यक्तींच्या समितीने सादर केलेल्या शिफारशीनुसार या वर्षीपासून विद्यार्थ्यांना तीनस्तरीय आहार (श्री कोर्स मिल) दिला जाणार आहे.

पान २ वर


■ जे विद्यार्थी अंडी खात नाहीत त्यांना केळी अथवा स्थानिक फळ दिले जाणार आहे. बचत गटाचे आहार तयार करण्याचे दर निश्चित केले आहेत. राज्य शासनाच्या सुधारित आदेशानुसार अंमलबजावणी केली जाईल.

– इरफान पटेल, शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी, इचलकरंजी महापालिका

# नाशिक शिक्षक मतदारसंघामध्ये शिंदे गटाच्या उमेदवाराच्या नावाशी साधर्म्य असणाऱ्या उमेदावराची माघार

● नाशिक, सचिन कदम :

विधान परिषदेच्या नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आमदार किशोर दराडे यांच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या नगर जिल्ह्यातील उमेदवाराने माघार घेतली. गेल्या आठवड्यात संबंधिताने अर्ज भरू नये म्हणून विभागीय आयुक्त कार्यालयात दबावतंत्राचा अवलंब होऊन त्याला धक्काबुक्की झाल्याची तक्रार अन्य उमेदवाराने केली होती. निवडणूक लढविण्यावर ठाम असल्याचे सांगणाऱ्या दराडे किशोर प्रभाकर यांनी रिंगणातून माघार घेतल्याने तर्कवितर्क लढविले जात आहेत. आतापर्यंत चार उमेदवारांनी



माघारी घेतली आहे.

या निवडणुकीच्या छाननी प्रक्रियेत ३६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. यातील नगरच्या कोपरगाव येथील दराडे किशोर प्रभाकर यांच्यासह शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवाराच्या नावाशी साधर्म्य साधणारे संगमनेर येथील संदीप गुळवे, मालेगाव येथील शेख मुख्तार अहमद व येवला येथील रुपेश लक्ष्मण दराडे या उमेदवारांनी माघार घेतल्याची माहिती विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिली.

अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार किशोर दराडे यांच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या एकाने तर ठाकरे गटाचे उमेदवार संदीप गुळवे यांच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या तिघांनी अर्ज दाखल केले होते. दिंडोरी लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार भास्कर भगरे यांच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या उमेदवारामुळे त्यांचे मताधिक्य एक लाखाने कमी झाले होते. प्रतिस्पर्ध्याला शह देण्यासाठी शिक्षक मतदारसंघात तसाच प्रयोग करण्याची तयारी अनेकांनी केल्याचे दिसते. त्या अनुषंगाने शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार म्हणून संदीप गुळवे यांच्या नावाशी साधर्म्य साधणारे संदीप भिमशंकर गुळवे, संदीप नामदेव गुळवे आणि संदीप वामनराव गुरुळे हे तीन अपक्ष तर शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार किशोर दराडे यांच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या किशोर प्रभाकर दराडे यांनी अर्ज दाखल केला होता.

पान २ वर

# नागपुरात चिकनगुनियाचे ५ रुग्ण आढळले, भूपेशनगरात अलर्ट; मनपाच्या पथकाद्वारे सर्वेक्षण

● नागपूर, नितीन देवळेकर :



गिट्टीखदान परिसरातील भूपेशनगरात चिकन गुनिया सदृश्य साथीच्या आजाराने ग्रस्त ५ रुग्ण आढळले आहे. त्यामुळे मनपाचा आरोग्य विभाग अलर्ट झाला असून, आरोग्य अधिकारी डॉ. दिपक सेलोकर व आरोग्याची संपूर्ण यंत्रणेकडून परिसरात सर्वेक्षण करण्यात येत आहे. शहरात उन्ह आणि ढगाळ वातावरणामुळे वातावरणात उम्मस दाटली आहे. त्वचा चिपचिपी झाली असून, घरोघरी कुलरचा वापर अधिक वेळ होत आहे. कुलरमुळे डासांचा उच्छाद वाढला असून साथीच्या आजार बळावले आहे. गिट्टीखदान परिसरातील भूपेशनगर या पॉश वस्त्यांमध्ये चिकन गुनियाचे ५ रुग्ण आढळले आहे. त्यामुळे दोन दिवसांपासून महापालिकेच्या आरोग्य विभागाने उपायोजना व सर्वेक्षण सुरू केले आहे. सर्वेक्षणात बऱ्याच घरांमध्ये तापाने फणफणलेले रुग्ण आढलले आहे.

पान २ वर

# पोलिसांसाठी अटलसेतूवर फक्त निवारा शेड, गस्ती वाहन नसल्याने गैरसोय

● उरण, भावना जैन :

सागरी अटलसेतूवर गस्त घालणाऱ्या पोलिसांना थांबण्यासाठी निवारा शेड आणि गस्तीला वाहन देण्याची मागणी एमएमआरडीएकडे केली होती. त्यानुसार पथकर नाक्यावर पोलिसांसाठी एका कंटेनरची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र गस्ती वाहन न मिळाल्याने त्याची प्रतीक्षा आहे. तर वाहतूक पोलिसांनी केलेल्या मागणीनुसार एका कंटेनरची सोय केली असल्याची माहिती न्हावा शेवा वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस



निरीक्षक जी. एम. मुजावर यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १२ जानेवारी रोजी नवी मुंबई आणि उरणला जोडणाऱ्या सागरी अटलसेतूचे उदघाटन करण्यात आले होते.या उद्घाटनाला सहा महिने उलटले आहेत. शिवडी-न्हावा शेवा सागरी अटलसेतूपैकी १०.४ ते १९.६ किलोमीटरचा मार्ग न्हावा शेवा वाहतूक पोलीस हद्दीत येत असून त्यांच्याकडे सुरक्षेची जबाबदारी आहे.गव्हाण, शेलघर टोलनाका / शिवाजीनगर टोल यांचाही समावेश आहे. या पुलाच्या सुरक्षेची जबाबदारी ही न्हावा शेवा वाहतूक विभागचीही आहे.

पुलावर गस्त घालत असताना उरणहून थेट मुंबईपर्यंत जावे लागत आहे. त्यामुळे या पुलावर सुरक्षा ठेवण्यासाठी उरण व मुंबई या दोन्ही भागांतून लक्ष देण्यासाठी किमान दोन वाहनांची आवश्यकता आहे. तर दुसरीकडे वाहतूक पोलिसांना ऊन आणि पावसाळयात बचाव करता यावा याकरिता निवारा शेडची आवश्यकता आहे. यात उन्हाळयाचे चार महिने सरले असून पावसाला सुरुवात झाली आहे.

# दिल्लीतून हायकमांडच्या फोननंतर कोकण, नाशिकबाबत समझोता

## नाना पटोलेंसोबतच्या कम्युनिकेशन गॅपवर उद्धव ठाकरेंचं भाष्य



● मुंबई, विशाल कारंडे :

विधानपरिषद निवडणुकीवरून महाविकासआघाडीमध्ये बिघाड झाल्याच्या चर्चांना उधाण आले होते. विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेस ठाकरे गटाची दोन ठिकाणी समेट झाली आहे. दिल्लीतल्या पक्षश्रेष्ठींचा फोन आला, त्यानुसार कोकण आणि नाशिकबाबत आम्ही समझोता केला आहे. महाविकास आघाडीत कोणताही बिघाड नाही,असे उद्धव ठाकरे म्हणाले. ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते. उद्धव ठाकरे म्हणाले, विधानपरिषद निवडणुकीवरुन आमच्यात कोणताच बिघाड झालेला नाही. संवादामध्ये लूज कनेक्शन होते. मी सुद्धा निवडणुकीच्या निकालानंतर सात - आठ दिवस बाहेर गेलो होतो. दरम्यान निवडणुकीच्या तारखा जवळ आल्या होत्या सर्व पक्षांनी आपआपले उमेदवार जाहीर केले होते.काँग्रेस पक्षश्रेष्ठींशी माझं आणि संजय राऊत यांचे बोलणं झालं. आम्ही बोलणं करून अर्ज मागे घेत आहोत.

पान २ वर

# पाकिस्तानी दहशतवाद्याचा दयेचा अर्ज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंनी फेटाळला, फाशीची शिक्षा कायम

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

लाल किल्ला हल्ला प्रकरणात दोषी ठरलेला पाकिस्तानीदहशतवादी मोहम्मद आरिफ उर्फ अशफाक याचा दयेचा अर्ज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी फेटाळला. सुमारे २४ वर्षे जुन्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पाकिस्तानी दहशतवाद्याला दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली होती. ३ नोव्हेंबर २०२२ रोजी सुप्रीम कोर्टाने मोहम्मद आरिफची



पुनर्विचार याचिका फेटाळली आणि फाशीची शिक्षा कायम ठेवली. २५ जुलै २०२२ रोजी कार्यभार स्वीकारल्यानंतर राष्ट्रपतींनी फेटाळलेली ही दुसरी दयेची याचिका आहे. दरम्यान, घटनेच्या कलम ३२ अंतर्गत दीर्घ विलंबाच्या कारणास्तव शिक्षा कमी करण्यासाठी दोषी अद्याप सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकतो.

मोहम्मद आरिफ हा पाकिस्तानी नागरिक आहेच. त्यासोबतच प्रतिबंधित लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी आहे. लाल किल्ल्यावरील हल्ल्याच्या चार दिवसांनंतर दिल्ली पोलिसांनी त्याला अटक केली होती. राष्ट्रपतींच्या सचिवालयाच्या २९ मे रोजी च्या आदेशाचा हवाला देत अधिकाऱ्यांनी सांगितले की, १५ मे रोजी प्राप्त झालेला मोहम्मद आरिफचा दयेचा अर्ज २७ मे रोजी फेटाळण्यात आला. यापूर्वी सुप्रीम कोर्टाने फाशीची शिक्षा कायम ठेवत आरिफच्या बाजूने कोणतीही परिस्थिती नसल्याचे सांगितले होते. लाल किल्ल्यावरील हल्ला हा देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वाला थेट धोका असल्याचे न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले होते. २२ डिसेंबर २००० रोजी दहशतवाद्यांनी लाल किल्ला संकुलात तैनात राजपुताना रायफल्सच्या ७ तुकड्यांवर गोळीबार केला.

पान २ वर

# अखेर पिंपरीतील सशुल्क वाहनतळ धोरण गुंडाळले; महापालिकेने केले ‘हे’ आवाहन

● पुणे, अभिजित येरल्लू :

महापालिकेने मोठा गाजावाजा करत आणलेले सशुल्क वाहनतळ (पे ॲण्ड पार्क) धोरण अखेर गुंडाळण्यात आले आहे. त्यामुळे शहरात वाहने उभी करण्यासाठी नागरिकांनी पैसे देऊ नये, असे आवाहन महापालिकेचे शहर अभियंता प्रमोद ओंबासे यांनी केले आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या आणि त्या लोकसंख्येच्या तुलनेत वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असून, रस्तेही अपुरे पडत आहे. शहरातील ठिकठिकाणी रस्त्यावर अनधिकृतपणे तसेच, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशाप्रकारे वाहने उभी केली जात होती. यामुळे शहरातील नागरिकांना



वाहतूक कोंडीच्या समस्येस तोंड द्यावे लागत होते. शहरातील नागरिकांसाठी वाहतूक सुरळीत होणे व वाहनतळाची सुविधा उपलब्ध होणे या हेतूने वाहतूक पोलीस आणि महापालिकेने सशुल्क वाहनतळ धोरण आणले.

शहरातील विविध भागांत याची अंमलबजावणी सुरू केली होती.

पान २ वर

## संपादकीय

# शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृती ???.

राज्य अभ्यासक्रम आराखडा ( शालेय शिक्षण) 2024 मसुद्यावर प्रतिक्रिया राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे,यांनी तयार केलेला राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) 2024 मसुद्यावर सागर रामभाऊ तायडे अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य यांनी प्रतिक्रिया नोंदविण्याबाबत केलेल्या आवाहनानुसार खालीलप्रमाणे हरकत या पत्राद्वारे लेखी ईमेल द्वारे नोंदविण्यात आली आहे.

इयत्ता तिसरी ते इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमामध्ये भगवद्गगीता, मनाचे श्लोक आणि मनुस्मृति यांच्या विषमतावादी विचारांचा, धोरणांचा समावेश करणे या बाबी भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार कलम 13, 14, 17, 19, 21, 28 नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या विरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत असून व हरकती नोंदविण्यात येत आहे.

आपल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार शालेय अभ्यासक्रमामध्ये मनाचे श्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे आक्षेपार्ह असून, धर्मनिरपेक्ष असलेल्या भारतातील सर्व नागरिकांस समान असलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि नैसर्गिक न्यायाच्या संकल्पनेला काळीमा फासणारी बाब आहे.

तसेच सर्जनशील भारताची निर्मिती करणाऱ्या शिक्षण प्रणालीमध्ये अशा प्रकारच्या समता मुलक समाज निर्मितीच्या संविधानाच्या तत्त्वाला मूठमाती देणाऱ्या विषमता वादाचा पुरस्कार व त्याचे समर्थन करणाऱ्या अभ्यासक्रमाचा शालेय शिक्षणात समावेश करून गोर-गरीब भारतीय नागरिकांमध्ये भय आणि मानवी विषमता निर्माण होण्यास खतपाणी घालण्याचा प्रयत्न स्पष्ट होत आहे.

आपल्या देशाच्या धर्मनिरपेक्ष संविधानाने देशातील सर्व जाती धर्मांना संरक्षित करत, कलम 28 प्रमाणे आश्वस्त केले आहे की, कलम 28 (1) नुसार, पूर्णतः राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही अशी तरतूद आहे, त्यामुळे सरकारकडून कोणत्याही धर्माच्या विचारसरणीच्या बाबी शिकविता येणार नाहीत..

त्याचबरोबर भारतीय संविधानातील कलम 13 (1) नुसार, या संविधानाच्या प्रारंभाच्या लगत्पूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या भागाच्या तरतुदींशी विसंगत असतील तेथवर ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्यवत आहे, 13 (2) नुसार राज्य या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे उल्लंघन करुन केलेला कोणताही कायदा, आदेश, नियम, विनिमय, सूचना, शिक्षण प्रशिक्षण इत्यादी शून्यवत ठरविले आहेत. असे असताना उपरोक्त बाबी शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे देशातील युवा वर्गाला अधोगतीच्या विषमतेच्या दिशेने पुन्हा घेऊन जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते आहे. वरील पार्श्वभूमीवर प्रस्तावित मसुदयामध्ये मनाचे श्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार 13, 14, 17, 19, 21, 28 नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या बाबी रद्द कराव्यात आणि संविधानाची प्रास्ताविका, अनुछेद 13 ते 32 पर्यंतचे मूलभूत अधिकार आणि भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये या मूल्यांचा समावेश करावे की ज्यामुळे भारतीय नागरिक आपल्या हक्क आणि अधिकारासंबंधी आणि कर्तव्या संबंधी जागृत होतील.तेच देश हितकारक आहे.

वरीलप्रमाणे दुरुस्ती न झाल्यास स्वतंत्र मजदुर युनियन महाराष्ट्र राज्य आणि संलग्न विविध संघटनांच्या वतीने महाराष्ट्र भरामध्ये तीव्र स्वरूपाचे पडसाद उमटतील आणि उग्र आंदोलन छेडण्यात येतील त्याची संपुर्ण जबाबदारी आपली असेल, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.



## आजची चित्रोळी

पाकळ्या मुलायम उमलून फुलती पुष्पे
मोत्यासम चमकूनी दवांकूर वेधती लक्षें
मधुकण परागी अलगद मधूर खुलतात
बीज जन्मास्तव मधु पक्व फळां देतात

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,**
**विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### “हे माझं शेवटचं उपोषण, आता थेट...

कोण कोण सोबत आहेत, हे सर्व माहित आहे. मुख्यमंत्र्यांचे ओएसडी लोकांना घेऊन दिल्ली पळत आहेत. तिकडून काय बनवून आणत आहेत माहीत नाही. माझ्या मराठ्यांना बदनाम करण्यासाठी काहीतरी आणलं असे. हे षडयंत्र सरकार घडवून आणत आहे. ते काय बळीचे बकरे बनवत असतील”, असंही जरांगे म्हणाले.

मी मुख्यमंत्री शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना सांगतो की त्यांनी मला आरक्षणाबाबत संपूर्ण माहिती द्यावी. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करणार आहेत, त्याला किती दिवस लागणार आहेत? ओबीसीतून आरक्षण देणार की नाही, सगेसोयऱ्यांची व्याख्या मान्य आहे की नाही ही सर्व माहिती फडणवीसांनी द्यावी. त्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही. सगळं क्लिअर झालं तर उपोषण स्थगित करायला काही अडचण नाही. तुम्ही असंच खेळत असाल तर हे माझं शेवटचं उपोषण असणार. मी काही मोकळा नाही, मी थेट विधानसभेच्या तयारीला लागणार”, असंही थेट मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.

### रत्नागिरीतील मिऱ्या बंधाऱ्याचे काम सुरू न...

त्यामुळे किनाऱ्याची मोठ्या प्रमाणावर धूप होऊन हे पाणी मानवी वस्तीत येण्याचा धोका निर्माण झाला आहे. पांढरा समुद्र ते जयहिंद चौकापर्यंतच्या टप्प्याचे काम करताना लागणाऱ्या यंत्रसामग्रीची ने-आण करण्यासाठी आवश्यक असलेल्या जागेवरून वाद होता. जागा मालकाने याला विरोध केल्यामुळे काम रखडले होते. परंतु, त्याने आता संमती दिली असली तरी समुद्राला उधाण असल्याने बंधाऱ्याचे तळातून खोदकाम करून काम करणे शक्य नाही. त्यामुळे पावसाळयानंतरच हे काम होण्याची शक्यता दिसत आहे.

त्यामुळे पावसाळ्यातील संकटाचा सामना कसा करायचा, या भीतीच्या छायेखाली असलेल्या मिऱ्यावासीयांनी मंगळवारी पत्तन विभागाचे अधिकारी साळुंखे यांची भेट घेतली व त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी साळुंखे यांनी संबंधित ठेकेदार आणि सल्लागार कंपनीच्या अधिकाऱ्यांशी बोलून मार्ग काढण्याचे आश्वासन या ग्रामस्थांना दिले. यावेळी मिऱ्या गावातील ग्रामस्थ सुनील कांबळे, नागेश कांबळे, राजू भाटकर, छोट्या भाटकर, बाबू कांबळे, मनोज पानगले, अनिल पानगले, विजय तळेकर, मुरलीधर पन्हळेकर, दत्तगुरू कीर आदी उपस्थित होते.

### तज्ज्ञ व्यक्तींच्या शिफारशीनुसार या...

तो दिल्यास विद्यार्थी शालेय पोषण आहार अधिक आवडीने खातील अशी अपेक्षा शिक्षण विभागाने व्यक्त केली आहे. त्यामध्ये तांदूळ, डाळी, कडधान्यापासून तयार केलेले आहार, मोड आलेले कडधान्य (स्प्राउट्स) आणि गोड पदार्थ म्हणून तांदळाची खीर, नाचणी सत्त्व याचा समावेश केला आहे.

### नाशिक शिक्षक मतदारसंघामध्ये शिंदे गटाच्या...

यातील प्रमुख पक्षांच्या उमेदवारांच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या प्रत्येकी एका उमेदवाराने माघार घेतली. यामुळे शिवसेना शिंदे गटासमोर नाम साधर्म्याची अडचण दूर झाली असली तरी शिवसेना ठाकरे गटासमोर एकसारख्या नावाचे दोन उमेदवार आहेत. संबंधितांच्या माघारीसाठी पडद्यामागून हालचाली सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

### नागपुरात चिकनगुनियाचे ५ रुग्ण आढळले,...

परिसरात आशा वर्कर कडून ताप आलेल्या रुग्णांचा शोध घेतला जात आहे. घरोघरी जाऊन पाणी साठवण टाक्यांमध्ये डासांच्या अळया व अंडी नष्ट करणारी औषधे टाकली जात आहेत. निरुपयोगी साहित्य, टायर, भंगार व फुटक्या वस्तूंची विल्हेवाट लावण्याचे आवाहन मनपाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी केले आहे.

### दिल्लीतून हायकमांडच्या फोननंतर कोकण,...

आता मला याबद्दल काही आता बोलायचं नाही.

मुंबई पदवीधर मतदार संघाचे उमेदवार अनिल परब यांच्या वचननामाचा अनावरण केलं.हा मतदार संघ आधीपासून आमचा आहे. सुशिक्षीत मतदारांचे प्रश्न वेगळे असतात. प्रमोद नवलकर यांनी आधी या मतदार संघांचे नेतृत्व केले आहे. आपल्या काही समस्या सोडविण्याचा प्रयत्न करू, हे मतदान 26 जूनला आहे. 26 जूनला सुट्टी नाही, कार्यालयात जाण्यापूर्वी मतदान करावं, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

### पाकिस्तानी दहशतवाद्याचा दयेचा अर्ज...

त्यामुळे तेथे तैनात असलेल्या तीन लष्करी जवानांचा मृत्यू झाला होता.

सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये या संदर्भात त्याला शिक्षा सुनावली. सुप्रीम कोर्टाने म्हटले होते की, आरोपी मोहम्मद आरिफ उर्फ अशफाक हा पाकिस्तानी नागरिक होता आणि त्याने भारतीय हद्दीत बेकायदेशीरपणे प्रवेश केला होता. तो इतर दहशतवाद्यांच्या सहकार्याने हा हल्ला घडवून आणण्याबद्दल दोषी आढळला आहे. यापूर्वी ट्रायल कोर्टाने ऑक्टोबर २००५ मध्ये त्याला फाशीची शिक्षा सुनावली होती. दिल्ली उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने त्यानंतरच्या अपीलांमध्ये हा निर्णय कायम ठेवला. त्यानंतर त्याने राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज केला. मात्र दया याचिका फेटाळून राष्ट्रपती मुर्मू यांनी त्याची फाशीची शिक्षा कायम ठेवली.

### अखेर पिंपरीतील सशुल्क वाहनतळ धोरण...

रस्त्यांवर वाहन उभी केलेल्यांकडून शुल्क वसूल करण्यासाठी महापालिकेने ७ एप्रिल २०२१ रोजी निर्मला ऑटोकेअर या संस्थेची नेमणूक केली होती.

वाहनचालकांनी तसेच, वाहतूक पोलिसांनी या योजनेला पाहिजे तसा प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे काही महिन्यांतच ही योजना अनेक ठिकाणी बंद करण्याची नामुष्की महापालिकेवर ओढावली. रडतखडत काही भागांत ही योजना सुरू होती. अखेर ६ एप्रिल २०२४ला ठेकेदाराची मुदत संपुष्टात आल्याने ही योजना बंद करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे नागरिकांनी वाहने उभी करण्यासाठी पैसे देऊ नयेत, असे आवाहन सहशहर अभियंता ओंबासे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# विश्वकर्मीय सुतार समाजातील नेत्यांनी ओबीसी संदर्भात कर्तबगारी दाखवावी अन्यथा समाज बहुजन चळवळीपासून अडगळीत पडेल!

**विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणाऱ्या सर्वच स्वयंघोषित नेत्यांनी ओबीसी संदर्भात कर्तबगारी दाखवावी अन्यथा विश्वकर्मीय सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.समाजात नेतेगिरी करणाऱ्या नेत्यांकडे ओबीसी संदर्भात जर दूरदृष्टी, निश्चित दिशा आणि ठोस कृती कार्यक्रम नसेल, समाज प्रबोधनात्मक शिवधनुष्य पेलता येत नसेल तर नैतिक मूल्यांचे, नैतिक धर्माचे पालन करावे आणि स्वतःला समाज नेतृत्व म्हणवून घेऊ नये.**

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व म्हणून जर नैतिक जबाबदारी समजत नसेल तर स्वतःच्या नावासाठी आणि मोठेपणासाठी उतावीळपणा करून संपूर्ण विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची दिशाभूल करु नये. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात ओबीसींसाठी तरतूद केलेली असून विश्वकर्मिय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक आधारावर ओबीसी प्रवर्गातीलच एक मोठा ओबीसी घटक आहे समाजात नेतेगिरी करणाऱ्या सर्वच स्वयंघोषित नेत्यांना याचा विसर पडू नये. विश्वकर्मीय सुतार समाज मुळातच बहुजन समूहातीलच ओबीसी घटक आहे याबाबत समाजात समाज जागृती अजिबात नाही त्यामुळे समाज अनभिज्ञ आहे. मी एक विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बांधव असून माझ्याकडे माझ्या जातीचा दाखला असून ओबीसी सुतार अशी सरकार दप्तरी नोंद आहे. ओबीसी, संविधान, जनगणना, आरक्षण, सत्ता, संपत्ती, ज्ञान, राजकीय हिस्सेदारी प्राप्त करण्यासाठी विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करणाऱ्या, स्वतःलाच संपूर्ण ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व समजणाऱ्या सर्वच स्वयंघोषित समाज नेत्यांनी राज्यातील कानाकोपऱ्यात खेडोपाडी गावागावात, वाडीवस्तीमध्ये प्रत्येक नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करून ओबीसी, संविधान, जनगणना, आरक्षण, सत्ता, संपत्ती, ज्ञान, राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करणे गरजेचे आहे. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला दिशाहीन आणि फक्त नेतेगिरी करण्यासाठीच उतावीळ झालेले समाज नेते लाभले तर मात्र विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.

ओबीसी आरक्षण संदर्भात राज्यातील अनेक ओबीसी संघटना आणि ओबीसी संघटनांचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी विविध पातळीवर आपापल्या परीने ओबीसींच्या हक्काच्या लढाईत उतरलेले असतांना मात्र ओबीसी सुतार समाजातील स्वतःला समाजाचे नेतृत्व म्हणवून घेणारे तथाकथित समाज नेते ओबीसींच्या लढाईत कुठेही उतरतांना दिसत नाहीत.समाजातील कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करून राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात स्पेशल ओबीसी, जनगणना, आरक्षण, सत्ता, संपत्ती, ज्ञान, राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज जागृती मेळाव्याचे आयोजन केल्याचे पुराव्यानिशी कोणालाही सिद्ध करता येणार नाही. हिच सत्य परिस्थिती समाजात असतांना मग

या स्वयंघोषित नेत्यांना विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेते म्हणवून घेण्याचा नैतिक अधिकार आहे काय याचा सुद्धा समाजाने विचार करण्याची नितांत गरज आहे यासाठी समाजाने सुद्धा जागरूक असणे गरजेचे आहे.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडल्यास समाजातील ओबीसी, संविधान, जनगणना, आरक्षण, सत्ता संपत्ती ज्ञान, राजकीय हिस्सेदारी इत्यादी महत्वपूर्ण विषयाच्या बाबतीत निष्क्रय आणि दिशाहीन तसेच कर्तृत्वशून्य समाज नेते समाजात फक्त स्वतःच्या नावासाठी मोठेपणासाठी समाज नेतृत्वपदाचा खोटेपणाचा गवगवा करतात हे सिद्ध होईल. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन अर्थात ओबीसी विचारधारे पासून दूर गेल्यास समाजात नेतेगिरी करणारे नेतेगिरीसाठी उतावीळ झालेले, समाज नेतेगिरीचं बाशिंग गुडघ्याला बांधलेले, नेतेगिरीच्या थाटात आणि समाज नेतेगिरीच्या रुबाबात वावरणारे समाजातील सर्वच तथाकथित स्वयंघोषित समाज नेते याला प्रामुख्याने जबाबदार असतील हे मी विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचा एक घटक म्हणून जबाबदारी पूर्वकच लिहीतो आणि तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधानिक पध्दतीने खुलासा करण्यास सुद्धा तयार आहे.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे, स्वतःला समाजाचे कैवारी, समाजाचे तारणहार समजणारे, स्वतःला समाजाचे प्रमुख समजणारे, स्वतःला समाजाचे नेतृत्व समजणारे समाजाला योग्य वैचारिक मार्गावर घेऊन जाण्यासाठी, समाजाला योग्य दिशा देण्यासाठी संबंधित समाज नेतृत्व सर्वगुणसंपन्न गुणवत्तापूर्ण बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिवान शिवाय सामाजिक वैचारिक आणि नैतिक दृष्टीने दिशादर्शक भूमिकेत वावरणारे असणे गरजेचे असते. कारण संपूर्ण समाजाची सामाजिक सर्वांगीण विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक जबाबदारी नैतिक दृष्टीने समाजात नेतेगिरी करणाऱ्या नेत्यांच्याच खांद्यावर असते. समाजाची दिशाभूल होऊ नये यासाठी समाजातील सुशिक्षित, उच्चशिक्षित, बुद्धिवान समाज बांधवांनी, सर्वसामान्य समाज बांधवांनी जागरूक असणे गरजेचे अन्यथा समाजाची दिशाभूल झाल्या शिवाय राहणार नाही आणि समाजाच्या डोक्यावर स्वयंघोषित नेतेगिरीचं ओझं कायमस्वरूपी लादल्या जाईल. जर समाजात नेतेगिरी करणारे दिशाहीन असतील तर मात्र विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून अडगळीत पडेल.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत समाजातील कोणत्याही सामाजिक संघटना आणि कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांनी सुतार समाजाची मात्र दिशाभूल करु नये. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची लोकसंख्या राज्यभरात 50 लाखापेक्षा अधिक असल्याचे सोशल मीडियावर वाचण्यात आले आहे. वास्तविक पाहता समाजाची लोकसंख्या राज्यात नेमकी किती लाख, किती कोटी आहे या बाबतीत शासकीय यंत्रणे मार्फत जनगणनेच्या संदर्भात कोणताही ठोस अहवाल कोणाकडेही नाही. कारण ओबीसींची जातीनिहाय जनगणना झालेली नाही. त्यामुळे विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत कोणत्याही सामाजिक संघटनेवर कोणत्याही स्वयंघोषित नेत्यांवर समाजाने अजिबात विश्वास ठेऊ नये. समाजाच्या लोकसंख्याच्या बाबतीत थातुरमातुर संभ्रम निर्माण करणारी आकडेवारी असून विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची निव्वळ दिशाभूल करणारी आहे.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा साज चढविलेल्या किमान 200 च्या जवळपास सामाजिक संघटना, संस्था विविध प्रकारचे विकास मंच कार्यरत आहेत. राज्यातील 36 जिल्ह्यातील जवळजवळ 360 तालुक्यात विश्वकर्मीय सुतार समाज विस्तारित आहे आणि राज्यभरात विविध राज्यस्तरीय सामाजिक संघटना कार्यरत आहेत. याच संघटनांच्या माध्यमातून समाजात विविध विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात असा संकेत समाजाला दिला जातो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक संघटनेचे जबाबदार अध्यक्ष आणि विविध पातळीवर पदाधिकारी वर्गाची निवड करण्यात येते. या मधूनच विश्वकर्मीय सुतार समाजात कर्तबगार, कर्तृत्ववान, कार्यसम्राट, समाज कैवारी, समाज तारणहार, समाज प्रमुख, समाज भूषण, समाजरत्न आणि असंख्य समाज नेतृत्व तर काही धडाकेबाज युवक नेतृत्व म्हणुन उदयास येत असतात. विशेषतः अशा पध्दतीने अत्यंत मानाच्या आणि सन्मानजनक उपाध्या नावासोबत जोडण्यासाठी विशिष्ट मूल्यांकन, मूल्यमापन पध्दत आणि कोणताही निश्चित मापदंड अस्तित्वात नाही. तरीही समाजात अशा पध्दतीने बिरुदावली जोडली जात असेल तर याला मात्र विश्वनिर्मात्याची विश्वकर्मीय चमत्कारिक देणगी म्हणावी लागेल.

# दहशतवादाची विषवल्ली उखडून टाका

काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले या घटनेला या ऑगस्ट मध्ये पाच वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. या घटनेमुळे काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्या आहेत स्पष्ट झाले आहे. जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले. गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला हा पहिलाच मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याचे टायमिंग देखील महत्वाचे आहे . केंद्रात नरेंद्र मोदींचा शपथविधी ज्या दिवशी होता त्याच दिवशी दहशतवाद्यांनी हा हल्ला केला याचाच अर्थ त्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्ल्याची एन आय ए मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. या हल्ल्याची पूर्ण चौकशी होईलच मात्र हा



हल्ला पाकिस्तान पुरस्कृत होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरशः भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही . पाकिस्तानमधील जनता अक्षरशः देशोधडीला लागली आहे. एकवेळचे पोटभर अन्न मिळाले तरी पुरेसे अशी त्यांची अवस्था आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात आजही दहशतवाद्यांचे अड्डे सुरू आहेत. तिथे पाकिस्तानी लष्कर दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्ल्याची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# पिकवलेला भाजीपाला 'ई कार्ट'द्वारे घरपोच



● ठाणे : जिल्ह्यात ग्रामीण भागातील महिलांना रोजगार मिळावा यासाठी कृषी विभागाच्या मार्फत महिला बचत गटांना 'ई – कार्ट' पुरविण्यात आले आहेत. या वाहनाच्या मदतीने महिलांना स्वत: पिकवलेल्या भाजीपाल्याची विक्री थेट ग्राहकांना करता येत आहे. यामाध्यमातून महिलांना उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण झाले असून जिल्ह्यातील पाच महिला बचत गटांना प्रायोगिक तत्त्वावर हे वाहन देण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा कृषी विभागाकडून देण्यात आली.

ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी केंद्र आणि राज्य स्तरावर महिलांसाठी विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची अंमलबजावणी जिल्हापातळीवर केली जाते. ठाणे जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदाल यांच्या संकल्पनेने जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून कृषी विभागात पद्मश्री सिंधुताई सपकाळ स्वाभिमानी योजना अंमलात आणण्यात आली.

या योजनेअंतर्गत काही महिला बचत गट तसेच ग्रामसंघ यांना भाजीपाला विक्रीसाठी साहित्य पुरविले जाते. त्यानुसार, थेट लाभ हस्तांतरण या तत्त्वानुसार ठाणे जिल्ह्यात २०२३-२४ या वर्षात ही योजना प्रायोगिकरित्या राबविण्यास सुरुवात झाली. यात ग्रामीण भागातील महिला बचत गटांना त्यांनी केलेल्या उत्पादनांची थेट ग्राहकांकडे विक्री करता यावी यासाठी ई- कार्ट वाहनांचे वाटप केले जाते.

### 'ई कार्ट' वाहन

'ई – कार्ट' वाहन हे आकाराने लहान असून त्यात भाजीपाला ठेवण्यासाठी लहान लहान कंटेनर आहेत. भाजीपाला ताजा रहावा यासाठी या वाहनात भाज्यांवर पाण्याचा फवारा करणारे यंत्रसुद्धा उपलब्ध आहे. तसेच गाडीवर ध्वनी विस्तारक यंत्रसुद्धा बसविण्यात आले आहे.

नुकतेच, कल्याण, मुरबाड, शहापूर आणि अंबरनाथमधील महिला बचत गटांना ई- कार्ट वाहनाचे वाटप करण्यात आले आहे. या वाहनांच्या माध्यमातून महिलांना स्वत: पिकवलेला भाजीपाला थेट ग्राहकांना विकता येत आहे. यामुळे त्यांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले असून त्यांनी पिकवलेल्या भाजीपाल्याला योग्य तो मोबदला मिळत असल्याचे चित्र आहे.

या योजनेसाठी भिवंडी तालुक्यातील दोन शहापूर तालुक्यातील दोन, अंबरनाथ व कल्याण तालुक्यातील प्रत्येकी एक असे एकूण पाच महिला बचत गटांना ई

**– कार्ट वाहन प्रायोगिक तत्त्वावर देण्यात आले आहे.**

ग्रामीण भागातील महिला बचत गटातील उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदाल यांच्या संकल्पनेतून ही योजना राबविण्यास सुरुवात झाली. या योजनेचा महिला बचत गटांना उत्तम लाभ होत आहे.

**– रामेश्वर पाचे, कृषि विकास अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद**

# डोंबिवलीत पुन्हा अग्नितांडव; औद्योगिक वसाहतीतील केमिकल कंपनीत स्फोट



● ठाणे : डोंबिवलीतील केमिकल कंपनीत स्फोट होऊन भीषण आग लागली. या आगीमुळे परिसरात मोठे धुराचे लोट उचं हवेत पसरल्यानं नागरिकांना मोठा त्रास होत आहे. डोंबिवली औद्योगिक वसाहतीतील फेज टू परिसरातील केमिकल कंपनीला ही आग लागली आहे. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या दहा गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. सध्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू आहे.

केमिकल कंपनीत लागली मोठी आग : डोंबिवली इथल्या औद्योगिक वसाहतीमधील इंडस कंपनीत आज सकाळी मोठी आग लागली आहे. या आगीमुळे परिसारत मोठे धुराचे लोट पसरले आहेत. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. डोंबिवली औद्योगिक वसाहतीमधील फेज टू परिसरात इंडस ही कंपनी आहे. विशेष म्हणजे यापूर्वी आग लागलेल्या कंपनीच्या शेजारील परिसरात ही कंपनी असल्यानं नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे.

स्फोटहोतअसल्यानं आगीवर नियंत्रण मिळवण्यात अडचण : डोंबिवली औद्योगिक वसाहतीमधील इंडस या केमिकल कंपनीत आग लागल्यानं मोठी खळबळ उडाली. या आगीत केमिकल कंपनीत मोठे स्फोट होत असल्यानं आगीवर नियंत्रण मिळवण्यात अडचण येत आहे. घटनास्थळावर अग्निशमन दलाच्या दहा गाड्या दाखल झाल्या असून त्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू आहे. मात्र आग लागल्याचं कारण अद्यापही अस्पष्ट असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

कामगार आत अडकल्याची भीती : अमुदान कंपनी स्फोटामुळे डोंबिवली एमआयडीसीतील 30 कंपन्या बंद करण्यात आल्या आहेत. या कंपन्या अन्य भागात स्थलांतरित करण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. त्यात पुन्हा एमआयडीसीतील रासायनिक कंपनीत आग लागल्यानं कंपनी मालक पुन्हा नागरिक, शासन, चौकशी यंत्रणांकडून लक्ष्य झाले. एमआयडीसीतील या सततच्या आगीच्या दुर्घटनांमुळे परिसरातील रहिवासी चिंताग्रस्त आहेत. दरम्यान घटनास्थळी अद्यापही दुर्घटनाग्रस्त कंपनीच्या आतून स्फोटाचे आवाज होत असल्यानं नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. घटनास्थळी अग्निशामक दलाच्या दहा गाड्या दाखल असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू आहे. या दुर्घटनेत अद्यापपर्यंत कुठलीही जीवितहानी झाली नसल्याचं सांगण्यात आलं आहे. मात्र या कंपनीत काही कामगार घटना घडण्याअगोदर काम करत असल्याचं सांगण्यात येत आहे.

# नेरुळ विभागात अनधिकृत धाब्यांवर धडक कारवाई



● नवी मुंबई - नवी मुंबई महनगरपालिका कार्यक्षेत्रातील बी विभाग नेरुळ कार्यालयांतर्गत महात्मा गांधी नगर डी ब्लॉक येथील एच पी कंपनीच्या पाईपलाईन वर असलेले अनधिकृत धाबे दि. 11 जून 2024 निष्कासित करण्यात आले. उप आयुक्त अतिक्रमण डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनानुसार बी विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ.अमोल पालवे यांच्या नियंत्रणाखाली सदरचे धाबे हटविण्यात आले. या धडक मोहिमेसाठी बी विभाग कार्यालय नेरुळ येथील अतिक्रमण विभागचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. यापुढे अशाच मोहिमा तीव्र करण्यात येणार आहेत.

# आम आदमी पार्टीचा स्मार्ट मीटर लावण्यास विरोध

कल्याण : वीज ग्राहकांची कसलीही व कुठलीही मागणी नसताना वीज ग्राहकांना जबरदस्तीने स्मार्ट मीटर लावण्याचा महावितरण कंपनीची मोहीम व आग्रह आहे. या मीटर मुळे ग्राहकांचा कुठलाही फायदा होणार नाही उलट अदानी व इतर कंपन्या यांच्या भल्यासाठी ग्राहकांच्या माथी हे मीटर मारत असल्याचा आरोप करत आम आदमी पार्टीने या स्मार्ट मीटरला विरोध केला आहे. याबाबत आपचे जिल्हाध्यक्ष ॲड. धनंजय जोगदंड यांनी कल्याणमधील महावितरणचे मुख्य अभियंता यांना निवेदन दिले आहे.

या मीटरची किंमत सिंगल फेज रुपये सोळाशे व थ्री फेज रुपये 3500 च्या आसपास आहे तरीही मीटर जवळपास 12 हजार रुपये देऊन लावण्याचा अट्टाहास होत आहे. ध्याचे मीटर्स उत्कृष्टपणे काम करत असताना ती बदलण्याची काय गरज आहे? केंद्र सरकारने प्रत्येकी मीटर मागे 900 रुपये अनुदान दिले आहे परंतु वरचे 11,100 रुपये कोण भरणार असा सवाल आपने उपस्थित केला आहे. नाही तर उद्या वीज दरवाढीच्या प्रस्तावाच्या वेळी ही तूट ग्राहकांच्या माथी मारणार हे निर्विवाद सत्य आहे.

# शिक्षक पदवीधर मतदारसंघासाठी निवडणूक निरिक्षकांची नियुक्ती


● नवीमुंबई : भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, मुंबई शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक आयोगामार्फत मतदारसंघनिहाय निवडणूक निरिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. अशी माहिती उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाच्या प्रसिध्दी पत्रकानुसार दिनांक. 26 जून 2024 रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर,कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीचे मतदान होणार आहे. या निवडणूकीच्या अनुषंगाने मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी श्रीमती. अंशु सिन्हा,भाप्रसे (एमएच:99) यांची निवडणूक निरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीमती. सिन्हा यांचा दूरध्वनी क्रमांक 9920793676 असून त्यांचा ईमेल आयडी anshus72@yahoo.com असा आहे. उमेदवार,राजकीय पक्ष,मतदार व नागरिकांना विभागीय आयुक्त कार्यालय, पहिला मजला, जुनी सचिवालय, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई -32 या कार्यालयात सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 या वेळेत श्रीमती. सिन्हा यांच्यांशी संपर्क साधता येईल.

कोकण विभाग पदवीधर मतदारसंघासाठी एन नवीन सोना, भाप्रसे (एमएच:2000) यांची निवडणूक निरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. सोना यांचा दूरध्वनी क्रमांक 8591248668 असून त्यांचा ईमेल आयडी nawin.sona@gmail.com असा आहे. उमेदवार,राजकीय पक्ष,मतदार व नागरिकांना विभागीय आयुक्त कार्यालय,पहिला मजला, जुनी सचिवालय, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई -32 या कार्यालयात सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 या वेळेत श्री. सोना यांच्यांशी संपर्क साधता येईल.

मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी डॉ.महेंद्र कल्याणकर, भाप्रसे (एमएच:2007) यांची निवडणूक निरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. कल्याणकर यांचा दूरध्वनी क्रमांक 9324565110 असून त्यांचा ईमेल आयडी mahendrakalyankar@gmail.com असा आहे. उमेदवार,राजकीय पक्ष,मतदार व नागरिकांना विभागीय आयुक्त कार्यालय,पहिला मजला, जुनी सचिवालय, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई -32 या कार्यालयात सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 या वेळेत डॉ. कल्याणकर यांच्यांशी संपर्क साधता येईल.

# ठाण्यात 27 मजली इमारतीत लागली भीषण आग, एका व्यक्तीचा मृत्यू



● ठाणे : ठाणे शहरात बुधवारी पहाटे 27 मजली निवासी इमारतीतील एका अपार्टमेंटमध्ये भीषण आग लागली. आगीत एका 47 वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झालाय. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख यासीन तडवी यांनी सांगितले की, तुळशीधाम सोसायटीतील इमारतीच्या चौथ्या मजल्यावर असलेल्या अपार्टमेंटमध्ये पहाटेच्या दरम्यान आग लागली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवलं. आगीत फर्निचरसह विविध साहित्य जळून खाक झालंय. फ्लॅटच्या एका खोलीत अरुण केडिया नावाचा एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळुन आला. त्याला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं. तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केल. दोन अल्पवयीन मुलांसह घरात उपस्थित असलेले इतर चार जण सुखरूप बाहेर आल्याचं अधिकाऱ्यानं सांगितलं.

# शिवाजी नगर परिसरात ड्रेनेज चेंबरची दुरावस्था



● कल्याण : कल्याण पश्चिमेतील बेतुरकरपाडा येथील शिवाजीनगर परिसरामधील ड्रेनेज चेंबर व लाद्या गेले कित्येक महिने तुटलेले आहेत. यामुळे ड्रेनेज मधील पाणी बाहेर येत असून तुटलेल्या लादयांमध्ये देखील घाण पाणी साचत आहे. या तुटलेले ड्रेनेज आणि तुटलेल्या लादयांमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. पावसाळयात याठिकाणी पावसाचे पाणी साचून रोगराई पसरण्याची भीती देखील नागरिकांनी व्यक्त केली आहे. याबाबत स्थानिक नगरिकांनी ठाणकर पाडा विभागीय शाखेत शिवसेना उपशहर प्रमुख तथा माजी नगरसेवक मोहन उगले यांच्याकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे कार्यकारी अभियंता घनश्याम नवांगुळ व श्याम सोनवणे यांनी प्रत्यक्ष जागेवर येऊन पाणी करून योग्य वेळी काम करून देण्याची मागणी उगले यांनी केली आहे.

# मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सर्व इमारतींच्या संरचना परीक्षणाची गरज

## नवी मुंबई महापालिकेची एपीएमसीला नोटीस



● नवी मुंबई : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांदा बटाटा बाजार, मसाला मार्केटमधील मध्यवर्ती सुविधा इमारत व मॅफको मार्केट धोकादायक घोषित केले असून इतर मार्केट ३० वर्षापेक्षा जुने झाले असल्याने इमारतींचे संरचना परीक्षण करा अशी नोटीस नवी मुंबई महापालिकेने एपीएमसीला बजावली आहे. सन १९८२ साली मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिति तुर्भे येथील सिडकोच्या १७५ एकर जागेत वसवण्यात आली आणि अल्पावधितच आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ निर्माण झाली, मात्र या इमारती आता जीर्ण झाल्या आहेत. काही ठिकाणी छताचा भाग कोसळतो तर माल धक्के तुटले, धक्यांच्या वरील भागातील प्लॅस्टर कोसळण्याच्या घटना घडतात. इमारतीला खांबाना तडे जाण्यास सुरुवात झाली. नवी मुंबई महापालिकेने सर्व प्रथम २००५ साली येथील कांदा बटाटा बाजारातील इमारती धोकादायक घोषित केल्या,तर मसाला मार्केट मधील मध्यवर्ती सुविधा इमारत व मॅफको मार्केट इमारत देखील धोकादायक घोषित करण्यात आले आहे. येथील गाळे धारकांना पर्यायी व्यवस्था नसल्याने यंदा देखील या व्यापाऱ्यांना आपला जीव मुठीत धरूनच व्यवसाय करावा लागणार आहे. या इमारती पडून काही दुर्घटना घडल्यास त्याच नवी मुंबई महानगर पालिका जबाबदार राहणार नाही अशा सूचना नवी मुंबई महानगर पालिकेने दिल्या आहेत. मागील अनेक वर्षापासून या इमारती आहेत धोकादायक घोषित करून देखील बाजार समितीने व्यापाऱ्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून न दिल्याने येथील व्यापाऱ्यांना आपला जीव मुठीत धरून व्यवसाय करावा लागत आहे.

### मागील वर्षी घडल्या दोन दुर्घटना

नवी मुंबई महानगर पालिकेने धोकादायक घोषित केलेल्या बाजार समितीतील कांदा बटाटा बाजारातील एफ गल्लीत मागील वर्षी १७ जुलै २०२३ रोजी गाळयाचा सज्जा कोसळला होता. मात्र ही घटना रात्री आठ वाजता घडली होती. त्यामुळे त्या ठिकाणी कोणती जीवित हानी झाली नाही. त्यानंतर पालिकेने सदर बाजार रिकामे करण्याचा प्रयत्न केला. मात्र पर्यायी जागा नसल्याने गाळे खाली करण्यास व्यापाऱ्यांनी नकार दिला. तसेच २२ नोव्हेंबर २०२३ रोजी धान्य बाजारातील वाय गल्लीत सज्जा/छताचा काही भाग पडल्याची घटना घडून दोन कामगार गंभीर जखमी झाले होते.

शहरातील ३० वर्ष जुन्या इमारतींचे तज्ञ वास्तू विशारद कडून तसेच नामांकित परीक्षण संस्थांकडून संरचना परीक्षण करून त्याचा अहवाल नवी मुंबई महानगर पालिकेकडे सादर करावा. तसेच अहवालात दुरुस्ती अथवा पाडकाम बाबत दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी असे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले आहेत. या आदेशानुसार एपीएमसी बाजार समितीला वारंवार पत्र देऊन देखील बाजार समितीने येथील इमारतींचे संरचना परीक्षण केलेले अहवाल दिलेले नाहीत. -भरत धांडे, तुर्भे विभाग अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका

कांदा बटाटा आणि मसाला मार्केटमधील मध्यवर्ती इमारत धोकादायक असल्याबाबत नोटीस आली आहे. तसेच बाजार समितीमधील तीस वर्षे जुन्या इमारतींचे संरचना परीक्षण करण्याचे नोटीस असून या इमारतींचे संरचना परीक्षण करण्यात येईल.

**-डॉ. पी एल खंडागळे, सचिव, एपीएमसी**

# मुरबाड मधील ग्रामसेवक अँटीकरपशनच्या जाळ्यात!

## वीस हजाराची लाज घेताना रंगेहात अटक !



● मुरबाड - मुरबाड तालुक्यातील नांदगाव -खुटल ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यासिन शेख याला मुरबाड पंचायत समिती कार्यालयामध्ये आज दुपारी लाचलुचपत प्रतिबंध पथक ठाणे यांनी सापळा लावून रंगेहात अटक केली आहे. मुरबाड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत मध्ये कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाने नवीन बांधलेल्या कार्यालायचे कामाचे सात लाख वीस हजार बिल काढण्यासाठी वीस हजाराची लाच मागितली असल्याचे तक्रारदारानी सांगितले असून गेली अनेक दिवस हा ग्रामसेवक लोकांना त्रास देत असल्याचे तक्रार दाराचे म्हणने आहे.

मुरबाड पंचायत समितीच्या सभागृहात आज ग्रामसेवकांचे प्रशिक्षण सुरु होते त्या दरम्यान दुपारी जेवणाच्या सुट्टी मध्ये सदर पथकाने ट्रॅप लावून या ग्रामसेवकास पकडले असून जबाब, पंचनाम्यासाठी मुरबाड पोलीस स्टेशन मध्ये नेण्यात आले. दरम्यान या लाचखोरी प्रकरणामुळे मुरबाड पंचायत समिती पुन्हा एकदा चर्चेत आली असून अशा भ्रष्टाचारी ग्रामसेवकावर झालेली कारवाई योग्य असल्याच्या प्रतिक्रिया मुरबाड करांकडून येत आहेत.

# रोज लसणाच्या दोन पाकळ्या खाल्ल्याने रक्तातील साखर अन् कोलेस्ट्रॉल झपाट्याने होईल कमी



● वाढते शहरीकरण, आजचे धकाधकीचे जीवन, त्यात खराब जीवनशैली, खाण्याच्या सवयी, शारीरिक व्यायामाचा अभाव आणि कमी पौष्टिक आहार या गोष्टी सध्या तरुणांमध्ये दिसत आहेत. आजच्या व्यस्त जीवनात आरोग्याची काळजी घेणे खूप कठीण आहे. वृद्धांबरोबरच तरुणांमध्येही अनेक आजार दिसून येत आहेत. त्यापैकी बहुतेक तरुण आणि वृद्ध उच्च कोलेस्ट्रॉलच्या समस्येने त्रस्त आहेत. आता तर तरुण वयात देखील हृदयविकाराचा झटका, मधुमेह आणि कमी रक्तदाब अशा समस्या पुढे येत आहेत. चुकीच्या आहारामुळे वाढणारे कोलेस्ट्रॉल हे यामागचे एक कारण आहे. तर दुसरीकडे मधुमेह हा जीवनशैलीमुले झपाट्याने वाढणारा आजार आहे. मधुमेहादरम्यान, खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे कारण थोडीशी निष्काळजीपणा आपल्या रक्तातील साखर वाढवू शकते. लसणाच्या दोन पाकळ्या रोज खाल्ल्याने रक्तातील साखर आणि कोलेस्ट्रॉल दोन्ही कमी होऊ शकतात का? यावर अभ्यासातून काय दिसून आले याविषयी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. आपण सविस्तर जाणून घेऊ... दिल्ली येथील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सचे वरिष्ठ सल्लागार, डॉ. मुकेश गोयल म्हणतात, "अभ्यासात असे आढळून आले आहे की, सध्याच्या मेटा-विश्लेषणामध्ये १,५०० हून अधिक सहभागींच्या एकत्रित एकूण २९ अभ्यासांचे परिणाम एकत्रित केले आहेत. हे दर्शविते की, लसणामुळे HbA1C पातळी कमी होते आणि कमी घनतेच्या लिपोप्रोटीन (LDL) किंवा खराब कोलेस्ट्रॉलमध्ये थोडीशी घट होते." लसण केवळ जेवणाची चवच वाढवत नाही तर त्याचे अनेक फायदेही आहेत. लसणाच्या सेवनाने रक्तातील साखर आणि कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. एलिसिन सारखे अनेक घटक लसणात आढळतात, जे रक्तातील साखर आणि चरबी संतुलित ठेवण्यास मदत करतात. संशोधकांचा असा विश्वास आहे की लसूण पूरक आहार घेतल्यास तुम्हाला फायदा होऊ शकतो. रक्तातील साखरेचे प्रमाण कमी करण्यासाठी लसूण खूप उपयुक्त असल्याचे संशोधनात आढळून आले आहे. लसणामुळे रक्तातील ग्लुकोजची पातळी कमी होते, जी मधुमेह व्यवस्थापनासाठी महत्त्वपूर्ण आहे, परंतु कोलेस्ट्रॉलची पातळी देखील कमी करते.

# अवघ्या काही मिनिटांत व्हाल तणावमुक्त अन् ताजेतवाने; करा फक्त 'ही' योगासने



● तणाव किती हानिकारक आहे याबद्दल आपण बरेच काही ऐकले आहे. तणाव हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. त्यामुळे अनेक आजारांचा धोका वाढत जातो. या तणावामुळे जगभरातील लोकांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर तणावाचे व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. तणाव येत असेल, तर तुम्ही घरीच काही गोष्टी करू शकता. अवघ्या पाच मिनिटांच्या योगानं तुम्ही तणावमुक्त होऊ शकता.

अशा या योगानं नैराश्य आणि चिंता लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होत आहे. योगातज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. श्वासोच्छवासाच्या योगानं ताणतणावाला दूर ठेवण्यास मदत मिळते; ज्यामुळे शरीरातील ऑक्सिजनची पातळी वाढते आणि अतिरिक्त कार्बन डाय-ऑक्साइड बाहेर टाकला जातो. तणाव तुमच्या रक्तदाब आणि हृदय गतीवर विपरीत परिणाम करतो.

शवासन

हे आसन अन्य आसने केल्यानंतर शरीर आणि मनाला आराम मिळावा यासाठी अखेरीस केले जाते. या आसनात मनुष्य हालचाल न करता, शवासारखे पडून राहतो म्हणूनच त्यास शवासन म्हणतात. या आसनामुळे शारीरिक, मानसिक थकवा, ताण कमी होण्यास मदत होते. उच्च रक्तदाब, हृदयरोग, निद्रानाश यांवरही हे आसन उपयुक्त आहे.

शवासन कसे करावे?

१. जमिनीवर चटई टाकून पाठीवर झोपावे.

२. संपूर्ण शरीर सैल सोडा आणि डोळे बंद करा.

३. हाताचे तळवे आकाशाच्या दिशेने जमिनीवर ठेवावेत.

४. हळूहळू श्वासावर लक्ष केंद्रित करा; मात्र तुम्हाला झोप लागणार नाही याची दक्षता घ्या.

५. पाच ते दहा मिनिटे या स्थितीत राहा.

अशा प्रकारे उन्हाळयात शरीर थंड ठेवण्यासाठी ही योगासने करा आणि निरोगी व आनंदी राहा.

योगिक श्वसन किंवा प्राणायाम म्हणजे काय?

'प्राण' म्हणजे वैश्विक जीवनशक्ती; तर 'आयाम' म्हणजे तिला वाढविणे. आपल्या शारीरिक आणि सूक्ष्म स्तरांसाठी प्राणशक्तीचे खूप महत्त्व आहे; प्राणशक्तीशिवाय आपले शरीर नष्ट होऊ शकते, तिच्यामुळेच आपण जिवंत आहोत. श्वसनाच्या माध्यमातून प्राणावर नियंत्रण मिळविणे म्हणजे प्राणायाम. या नासिकांद्वारे श्वास घेणे व सोडणे यांद्वारे ही प्रक्रिया केली जाते.

योगिक श्वासोच्छवास : ही क्रिया खाली दिल्याप्रमाणे दोन भागांत विभागली गेली आहे.

ओटीपोटात श्वास घेण्यासाठी या चरणांचे अनुसरण करा:

१. उजवा हात नाभीवर आणि डावा हात छातीच्या वरच्या भागावर ठेवा..

२. आता तुमच्या पोटाच्या भागावर पूर्ण लक्ष ठेवून आणि जागरूक राहून खोल आणि दीर्घ श्वास घ्या.

३. नंतर पूर्ण श्वास सोडा. आता तुमचे पोट पूर्णपणे फुगल्यासारखे वाटेल.


नाडीशोधन

शारीरिक व मानसिक ताणतणाव घालविण्यासाठी प्राणायामाची ही क्रिया अधिक महत्त्वाची आहे. प्राणायामाच्या या कृतीमुळे श्वसनमार्ग मोकळा होतो आणि रक्ताभिसरण सुधारते.

कपालभाती

कपालभाती ही श्वसनाचा त्रास असलेल्या रुग्णांसाठी रामबाण औषधापेक्षा कमी नाही. कपालभाती रक्तातील ऑक्सिजनची पातळी वाढविण्यास मदत करते. या योगासनामुळे फुप्फुसाची क्षमता वाढते. त्याचबरोबर शरीरात साचलेले विषारी पदार्थ बाहेर टाकले जातात. तसेच, जर तुम्हाला तणावाचा त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी हे खूप प्रभावी आसन ठरू शकते. कपालभातीमुळे तुम्हाला मानसिकदृष्ट्याही शांत झाल्याची अनुभूती मिळेल.

# शरद पवार आणि 'झपाटलेला' चित्रपटाचं आहे खास कनेक्शन



● महेश कोठारे दिग्दर्शित 'झपाटलेला' चित्रपट १९९३ साली प्रदर्शित झाला होता. लक्ष्मीकांत बर्डे, किशोरी अंबिये, दिलीप प्रभावळकर, विजय चव्हाण, पूजा पवार, रविंद्र बेर्डे अशी तगडी कलाकार मंडळी असलेला 'झपाटलेला' चित्रपट आजही आवडीनं पाहिला जातो. मराठी रसिक प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटानं अढळ स्थान निर्माण केलं आहे. अशा लोकप्रिय चित्रपटाचं खास कनेक्शन शरद पवारांशी आहे? ते कसं काय? याविषयी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमधून महेश कोठारे यांनी सांगितलं.

महेश कोठारे यांनी नुकतीच 'लोकमत फिल्मी'ला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी शरद पवार व 'झपाटलेला' चित्रपटाच्या कनेक्शनविषयी सांगितलं. ते म्हणाले, "जेव्हा माझा चित्रपट 'झपाटलेला' आला तेव्हा माझी अशी इच्छा होती की, मराठीतला पहिला चित्रपट परदेशात प्रदर्शित करायचा. कारण चित्रपट गाजला होता आणि लोकांना खूप आवडला होता. तर मला असं वाटलं हा चित्रपट आपण लंडनमध्ये प्रदर्शित करूया. लंडनमध्ये बऱ्यापैकी मराठी प्रेक्षक आहेत. त्यामुळे आम्ही मग लंडनला गेलो. आमचं सगळं कुटुंब गेलं होतं. आम्ही फिरायला म्हणून गेलो होतो. तेव्हा म्हटलं, आपल्याला तिकडे प्रिमियर करता येतो का? बघू या."

"माझा सख्खा चुलत दूरचा भाऊ होता. आता तो अहयात नाहीये. मधूकर कोठारे असं त्याचं नावं. तेव्हा लंडनमध्ये तो लोकप्रिय होता. त्याची पत्नी शिला कोठारे.

## दिनविशेष

**घटना**

२०१८ : फोक्सवॅगन कंपनीला उत्सर्जन (Emission) घोटाळ्यासाठी एक अब्ज युरो (8190 करोड )चा दंड ठोठावण्यात आला आहे.

२००७: अल अस्कारी मशिद, इराक दुसऱ्यांदा बॉम्बस्फोट हल्ला झाला.

२००५: मायकेल जॅक्सन - यांना १९९३ मध्ये एका मुलाचा लैंगिक छळ केल्याच्या आरोपातून दोषमुक्तता.

२००२ : अँटी बॅलिस्टिक क्षेपणास्त्र करार या करारातून अमेरिकेची माघार.

२००० : विश्वनाथन आनंद स्पेन मधील माद्रिद येथे एकाच वेळी १५ स्पर्धकांविरुद्ध खेळताना ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंद याने बारा लढतीत विजय मिळविला.

१९९७ : दक्षिण दिल्लीतील उपहार सिनेमागृहाला लागलेल्या आगीत ५९ जण मृत्युमुखी पडले, तर सुमारे १०० जण जखमी झाले.

**जन्म**

१९९४ : दीपिका कुमारी भारतीय तिरंदाज पद्मश्री

१९६५ : मनिंदर सिंग भारतीय क्रिकेटपटू

१९६४ : पीयूष गोयल भारतीय राजकारणी आणि कॅबिनेट मंत्री

१९५१: अँटोनियो पेना- मेक्सिकन कुस्ती प्रवर्तक, Lucha Libre AAA वर्ल्ड वाइडचे संस्थापक (निधन: ५ ऑक्टोबर २००६)

१९३७ : आंद्रेस व्हिटॅम स्मिथ द इंडिपेंडंटचे सहसंस्थापक

१९२८: जॉन फोर्ब्स नॅश ज्युनियर अमेरिकन गणितज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक (निधन: २३ मे २०१५)

१९२३ : प्रेम धवन - भारतीय गीतकार पद्मश्री (निधन: ७ मे २००१)

**निधन**

२०२२ : हरी चंद - भारतीय धावपटू आशियाई गेम्स सुवर्ण पदक (जन्म: १ एप्रिल १९५३)

२०२२ : शुभोमय चटर्जी - बंगाली कलाकार

२०२०: वसंत नायसादराय रायजी भारतीय क्रिकेटपटू आणि क्रिकेट इतिहासकार (जन्म: २६ जानेवारी १९२०)

२०१३ : डेव्हिड ड्यूईश ड्यूईश इंक. कंपनीचे संस्थापक

२०१२ : मेहदी हसन - पाकिस्तानी गझलगायक गझलसम्राट (जन्म: १८ जुलै १९२७)

१९६९: आचार्य अत्रे - मराठी विनोदी लेखक (जन्म: १३ ऑगस्ट १८९८ )

१९६९ : प्रल्हाद केशव अत्रे विनोदी लेखक, पत्रकार, शिक्षणशास्त्रज्ञ, राजकारणी (जन्म: १३ ऑगस्ट १८९८)

# श्रीलंका गाशा गुंडाळणार; नेपाळविरुद्धची लढत पावसामुळे रद्द झाल्याचा फटका




● खराब कामगिरी आणि पावसाने केलेला दगाफटका यामुळे श्रीलंकेचं टी२० वर्ल्डकप स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. नेपाळविरुद्ध मोठ्या फरकाने जिंकत स्पर्धेतलं आव्हान जिवंत राखण्याची संधी श्रीलंकेकडे होती. मात्र पावसामुळे ही लढत रद्दच झाल्याने श्रीलंकेचा मार्ग खडतर झाला आहे.

श्रीलंकेला सलामीच्या लढतीत दक्षिण आफ्रिकेकडून मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं. दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेचा ७७ धावांत खुर्दा उडवला. त्यानंतर अवघ्या १६.२ षटकात ४ विकेट्सच्या मोबदल्यात त्यांनी हे लक्ष्य गाठलं. यामुळे दक्षिण आफ्रिकेचा रनरेट उत्तम झाला मात्र श्रीलंकेली गच्छंती गुणतालिकेत तळाशी झाली.

गेल्या काही वर्षात श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यातील सामने अतिशय चुरशीचे होतात. भारत-पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया-इंग्लंड या सामन्यांना जसं पारंपरिक द्वंद्वाचं स्वरुप येतं तसं या सामन्यांना येतं. वर्ल्डकपमधल्या लढतीतही हेच पाहायला मिळालं. अतिशय रंगतदार लढतीत बांगलादेशने श्रीलंकेवर २ विकेट्सनी विजय मिळवला. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना १२४ धावांचीच मजल मारली. सलामीवीर पाथुम निसांकाचा ४७ धावांचा अपवाद वगळता एकाही फलंदाजांला मोठी खेळी करता आली नाही. बांगलादेशतर्फे मुस्ताफिझूर रहमान, रिषाद हुसेन यांनी प्रत्येकी ३ तर तास्किन अहमदने २ विकेट्स पटकावल्या.

प्रत्युत्तरादाखल खेळताना बांगलादेशची सुरुवातही खराब झाली. लिट्टन दासने ३६ धावांची खेळी करत बांगलादेशचा डाव सावरला. तौहिद हृदॉयने २० चेंडूत एक चौकार आणि ४ षटकारांसह ४० धावांची खेळी केली. अनुभवी महमदुल्लाने नाबाद १६ धावांची खेळी करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. श्रीलंकेतर्फे नुवान तुषाराने १८ धावांच्या मोबदल्यात ४ विकेट्स घेतल्या पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

दोन सामन्यात दोन पराभव झाल्याने श्रीलंकेला नेपाळविरुद्ध दणदणीत विजय आवश्यक होता. मात्र पावसामुळे हा सामनाच होऊ शकला नाही. ड गटात दक्षिण आफ्रिकेचा दमदार आगेकूच करत आहे. दुसऱ्या जागेसाठी बांगलादेश, नेदरलँड्स यांच्यात चुरस आहे. श्रीलंकेने नेदरलँड्सविरुद्धचा सामना जिंकला तरी त्यांचे तीनच गुण होतील. त्यामुळे त्यांच्या सुपर८ फेरीच्या आशा मावळल्या आहेत.

पाकिस्तानचा कॅनडावर विजय

अमेरिका आणि पाठोपाठ पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत यांच्याविरुद्ध पराभूत झाल्याने पाकिस्तानवर प्राथमिक फेरीतच गाशा गुंडाळण्याची वेळ ओढवणार असं चित्र होतं. मात्र कॅनडाविरुद्ध व्यावसायिक खेळ करत पाकिस्तानने आव्हान जिवंत राखलं आहे.

कॅनडाला प्रथम फलंदाजी करताना १०६ धावाच करता आल्या. सलामीवीर आरोन जॉन्सनने ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५२ धावांची शानदार खेळी केली मात्र बाकी फलंदाजांनी पाकिस्तानच्या गोलंदाजांसमोर सपशेल शरणागती पत्करली. पाकिस्तानकडून मोहम्मद आमिर आणि हारिस रौफ यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या. मोहम्मद रिझवान (५३) आणि बाबर आझम (३३) यांच्या संयमी खेळीच्या बळावर पाकिस्तानने ७ विकेट्स राखून विजय मिळवला. मोहम्मद आमिरला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. पाकिस्तानला सुपर८ साठी पात्र ठरण्यासाठी बऱ्याच जर तर समीकरणं जुळून येणं आवश्यक आहे.

ऑस्ट्रेलियाने उडवला नामिबियाचा धुव्वा

बलाढ्य ऑस्ट्रेलियाने अनुनभवी नामिबियाचा धुव्वा उडवत सुपर८ गटात आगेकूच केली आहे. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाच्या माऱ्यासमोर नामिबियाच्या फलंदाजांनी गुडघे टेकले. कर्णधार गेरहार्ड इरॅसमने ३६ धावांची झुंजार खेळी केली. ऑस्ट्रेलियातर्फे फिरकीपटू ॲडम झंपाने १२ धावात ४ विकेट्स पटकावल्या. जोश हेझलवूड आणि मार्कस स्टॉइनस यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली. ट्वेन्टी२० प्रकारात १०० विकेट्स पटकावणारा झंपा ऑस्ट्रेलियाचा पहिलाच फिरकीपटू आहे. हे छोटेखानी आव्हान ऑस्ट्रेलियाने अवघ्या ३२ चेंडूत पार करत दणदणीत विजय साकारला. ट्रॅव्हिस हेडने १७ चेंडूत ३४ तर मिचेल मार्शने ९ चेंडूत १८ धावांची खेळी केली. झंपाला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. ऑस्ट्रेलियाने तिन्ही सामन्यात विजय मिळवला आहे.

## राशि भविष्य

**मेष** — तुमचा जबरदस्त लवचिकपणा आणि निडरपणा तुमच्या मानसिक ताकद अधिक वाढविणारा ठरेल. कोणतीही परिस्थिती ओढवली तरी अशी खंबीर भूमिका तुम्हाला ती परिस्थिती तुमच्या नियंत्रणात ठेवण्यासाठी सहाय्यकारी ठरेल.

**वृषभ** — कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि ज्या गोष्टी तुम्हाला आवडतात त्याच करा. आजच्या दिवशी तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे परंतु, या सोबतच तुम्ही दान-पुण्य ही केले पाहिजे कारण यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. मुलांच्या बक्षिस समारंभाचे आमंत्रण हा तुमच्यासाठी आनंदाचा मार्ग ठरु शकतो.

**मिथुन** — आज तुमचे स्वास्थ्य उत्तम राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुमच्या उत्तम स्वास्थ्य सोबत आज तुम्ही आपल्या मित्रांसोबत खेळण्याचा प्लॅन बनवू शकतात. जर तुम्ही कुणाकडून आपली उधारी माघात असाल आणि तो काही कारणास्तव तुमच्या गोष्टीला टाळत असेल तर, आज तो न बोलता तुम्हाला पैसे परत करेल.

**कर्क** — अत्यंत व्यस्त वेळापत्रकातदेखील आपले आरोग्य चांगले असेल. नव्या आर्थिक करारांना अंतिम स्वरुप मिळाल्यामुळे ताजा अर्थपुरवठा होईल. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ. प्रेमातील वेदना आज तुम्हाला झोपू देणार नाहीत.

**सिंह** — देणगी आणि धर्मादाय कामामध्ये स्वत:ला गुंतवा, त्यातून तुम्हाला मन:शांती लाभेल. आज तुम्हाला आपल्या संतानमुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता दिसत आहे यामुळे तुम्हाला बराच आनंद होईल. वादविवाद, दुस-यावर तोंडसुख घेणे आणि इतरांमधील दोष शोधत राहणे टाळा.

**कन्या** — गर्भवती महिलांसाठी आजचा दिवसा फारसा चांगला नाही, चालताना अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. अनोळखी कुणी व्यक्ती तुमच्या घरी येऊ शकतो त्यामुळे तुम्हाला सामान खरेदी करावे लागू शकते जे तुम्ही पुढील महिन्यात खरेदी करणार होते.

**तूळ** — अतिखाणे टाळा, तुमच्या वाढत्या वजनावर सातत्याने लक्ष असू द्या. आजचा दिवस फारसा लाभदायक नाही, त्यामुळे पैशांची स्थिती तपासा आणि आपल्या खर्चांवर मर्यादा घाला. मुलांनी त्यांच्या अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रीत करण्याची आणि भविष्याची योग्य योजना करण्याची गरज आहे.

**वृश्चिक** — वाहन चालविताना, विशेष करुन वळणावर काळजी घ्या, दुस-यांचा निष्काळजीपणा तुमच्यासाठी अडचणी निर्माण करु शकतो. ज्या लोकांनी कुठे गुंतवणूक केली होती आजच्या दिवशी तुम्हाला आर्थिक हानी होण्याची शक्यता आहे. जवळच्या मित्रांचे आणि जोडीदारांचे आक्षेपार्ह कृत्य तुमचे आयुष्य खडतर करु शकते.


**धनु** — तुमची कमकुवत इच्छाशक्ती यामुळे तुम्ही भावनिक व मानसिकदृष्ट्या कमजोर बनू शकाल. जर तुम्ही लोन घेणार असाल आणि बऱ्याच दिवस याच कामात असाल तर, आजच्या दिवशी तुम्हाला लोन मिळू शकते. नातेसंबंध नव्याने दृढ करण्याचा दिवस. गर्लफ्रेंड तुम्हाला धोका देऊ शकते.

**मकर** — तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते. तुम्ही अतिशय उत्साहपूर्ण नवीन परिस्थितीचा अनुभव घ्याल - त्यामुळे तुम्हाला आर्थिक फायदा संभवतो. कुटुंबातील ताणतणावांमुळे तुमचे लक्ष विचलित होऊ देऊ नका.

**कुंभ** — स्वत:मध्ये प्रगती करणारे प्रकल्प हाती घेतलेत तर त्याचा दुहेरी फायदा होईल - तुम्हाला चांगले वाटेल आणि तुम्ही अधिक आत्मविश्वास बाळगू शकाल. लोकांना नेमके काय हवेय हे समजावून घ्या आणि तुमच्याकडून काय हवे आहे तेही समजून घ्या - परंतु आज खर्च करताना उधळपट्टी करू नका.

**मीन** — चार भिंती बाहेरील खेळांचे तुम्हाला आकर्षित करतील. ध्यानधारणा आणि योगाचा तुम्हाला फायदा होईल. अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा. मित्रपरिवार आणि नातेवाईकांबरोबर मजा करा. प्रेमाची उणीव भासणारा दिवस.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आढळले कॉलराचे दोन रूग्ण



● पिंपरी : शहरातील भोसरी परिसरात जलजन्य आजार असलेल्या कॉलराचे दोन रूग्ण आढळले आहेत. दोघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर, तिघांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. भोसरी येथील धावडे वस्तीमध्ये महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या जलवाहिनीमधून एका नागरिकाने नळजोड घेतले होते. मात्र, नळजोड घेताना खबरदारी न घेतल्यामुळे वाहिनीला गळती झाली. यातून दुषित पाणी पुरवठा होऊन संबंधित दोन रुग्णांना कॉलराची लागण झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. या दोन्ही रूग्णांवर महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर तिघांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

कॉलरा हा आजार दुषित पाण्यातून होतो. त्यानुसार धावडेवस्ती परिसरातील पाणी तपासणीसाठी घेण्याच्या सूचना वैद्यकीय विभागाने पाणी पुरवठा विभागाला केली आहे. तसेच वैद्यकीय विभागाकडून भोसरी परिसरात सर्वेक्षणही करण्यात येत आहे. रुग्ण संख्या वाढू नये, यासाठी विशेष खबरदारी घेतली जात असल्याचे महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले. जलवाहिन्यांमध्ये मलजल गेल्यामुळे या तिघांना कॉलरा झाल्याचा संशय आहे. नागरिकांनी पाणी उकळून प्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# कृष्णा खोऱ्यातील महापूर रोखण्यासाठी उपाययोजना करू

## अलमट्टी प्रकल्पाच्या अधीक्षक अभियंत्यांची ग्वाही



● कोल्हापूर : कृष्णा खोऱ्यातील महापुराला रोखण्यासाठी अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधारा (बॅरेज) मधील पाण्याची पातळी नियमानुसार ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करू, असे आश्वासन अलमट्टी धरण प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता रमणगोंडा हुन्नूर आणि त्यांच्या सहकारी अभियंत्यांनी तेथील धरणावर दिले.

कृष्णा खोऱ्याला बसणारा महापुराचा तडाखा रोखण्यासाठी गेली पाच ते सहा वर्षे कृष्णा नदी महापूर नियंत्रण कृती समितीतर्फे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. मात्र अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधाऱ्यामधील पाणीसाठा आणि त्या दोन्हीही पाणीसाठ्यांचे परिचलन व्यवस्थित होत नसल्याची सातत्याने तक्रार आहे. त्यामुळेच महापुराचा धोका उद्भवतो, असेही निष्कर्ष आहेत. या पार्श्वभूमीवर समितीतर्फे अलमट्टी धरण आणि हिप्परगी बॅरेज यांचा पाहणी दौरा आयोजित केला होता. यावेळी अलमट्टी प्रकल्पाचे (कर्नाटक जलसंपदा विभाग) अधीक्षक अभियंता रमणगोंडा हुन्नूर आणि त्यांचे सहकारी अभियंते यांच्याबरोबर समितीच्या शिष्टमंडळाने चर्चा केली. त्यावेळी त्यांनीही पूर्ण सकारात्मक प्रतिसाद दिला.

महाराष्ट्रात आणि कर्नाटकात महापूर येऊ नये यासाठी कसोशीने प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कृष्णा,वारणा व पंचगंगा या नद्यांना येणाऱ्या महापुराने या नद्यांच्या काठावर भीतीचे वातावरण असते. केंद्रीय जल आयोगाच्या निर्देशांचे पालन केल्यास आणि त्यानुसार सर्व धरणांचे परिचलन केल्यास महापूर नियंत्रित करता येऊ शकतो हे कृष्णा महापूर नियंत्रण नागरिक कृती समितीने दाखवून दिले आहे. महापूर रोखण्यासाठीच्या उपाययोजनांबद्दल सातत्याने शासनासोबत व लोकांच्या सोबत चर्चेतून मार्ग निघावा यासाठी बरेच कार्यक्रम व उपक्रम हाती घेतले आहेत. परंतु अलमट्टी धरणातील पाणीसाठा आणि ऐन पावसाळ्यात त्यातून होणारा कमी विसर्ग, तसेच हिप्परगी बॅरेज (बंधारा)मधीलही पाणीसाठा याबद्दल अनेक मतमतांतरे होती. त्यामुळे कर्नाटकातील संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा आणि प्रत्यक्ष अलमट्टी धरणाची पाहणीही आवश्यक होती. त्यानुसार दोन दिवस हा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये जलतज्ञ, जल अभ्यासक, पत्रकार सहभागी झाले होते.

कर्नाटक जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी या अभ्यास दौऱ्यात सहभागी झालेल्यांचे हार्दिक स्वागत केले. सविस्तर चर्चा केली. तसेच केंद्रीय जल आयोगाच्या निकषांचीही माहिती घेतली. महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्याप्रमाणेच कर्नाटकातील काही जिल्ह्यानाही महापुराचा दणका बसतो. त्यामुळे महापूर रोखण्यासाठी उपाययोजना अत्यावश्यक आहेत असे अभ्यास गटाने कर्नाटकातील अधिकाऱ्यांना सांगितले. त्यांनीही आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे मनःपूर्वक मान्य केले.

अलमट्टी धरणातील पाणीसाठा केंद्रीय जल आयोगाने (सीडब्ल्यूसी) घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वा (गाईडलाईन) नुसार व्हावा असे त्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास अभ्यास गटाने आणले. त्यांनी सांगितले की आम्ही सीडब्ल्यूसीच्या गाईडलाईन पाळत नाही. त्या पाळल्या पाहिजेत असे कुठेही दिले गेले नाही. परंतु त्या गाईडलाईन पाळणे आवश्यक आहे असे अभ्यास गटाने त्या अधिकाऱ्यांना सांगितले.

# भरधाव एचपी गॅसच्या ट्रकने ज्येष्ठ दाम्पत्याला उडवले; आकाशवाणी चौकातील घटना, महिलेचा मृत्यू



● छत्रपती संभाजीनगर – गॅस सिलिंडरची वाहतूक करणाऱ्या भरधाव ट्रकने रस्ता ओलांडणाऱ्या ज्येष्ठ दाम्पत्याला उडवले. यामध्ये गंभीर जखमी महिलेचा मृत्यू झाला, तर ज्येष्ठ व्यक्तीवर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना जालना रोडवरील आकाशवाणी सिग्नल चौकात मंगळवारी रात्री ८ च्या सुमारास घडली. अपघातग्रस्त ट्रक एचपी गॅसची वाहतूक करत होता. अपघात एवढा भीषण होता की ट्रकने दोघांनाही फरफटत नेले. यासंदर्भात जिन्सी पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, अपघातामध्ये डोंबिवली येथील अनिता बाहेती (वय ६०) यांचा मृत्यू झाला, तर यतीराजजी बाहेती (वय ६५ ) हे जखमी झाले.

बाहेती दाम्पत्याला दोन मुली असून या घटनेची माहिती मिळताच छत्रपती संभाजीनगरकडे येण्यासाठी त्या निघालेल्या आहेत. बाहेती दाम्पत्य छत्रपती संभाजीनगरमधील मृत एका नातेवाईकांच्या गोड जेवणासाठी येथे आलेले होते. या गोड जेवण उरकून ते जालना रस्ता ओलांडत पुढे जात होते. आकाशवाणी चौकात त्यांना एचपी गॅसच्या ट्रकने उडवले. या घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस आयुक्त भुजंग साहेब, वाहतूक पोलीस निरीक्षक अमोल देवकर, सह वाहतुक कर्मचारी आकाशवाणी चौकात दाखल झाले. त्यांनी वाहतुक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले, जिन्सी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नामदेव सुरडकर, अंमलदार नरेंद्र चव्हाण यांच्यासह जिन्सी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच मनपाच्या सफाई कर्मचारी व रिक्षाचालकांची मोलाची मदत झाली.

# Indian Academy of Pediatrics demands CBI probe into NEET 'irregularities'

Pune : The Indian Academy of Pediatrics (IAP) has demanded a Central Bureau Investigation (CBI) probe into the alleged irregularities in this year's National Eligibility-cum-Entrance Test (Undergraduate) and called for a re-examination to ensure a fair evaluation process.

"The NEET UG 2024 has 67 candidates securing 1st rank with a perfect score of 720 which is quite questionable to the data and statistics provided by NTA [National Testing Agency] for the past few years," Dr G V Basavaraja, IAP national president, told The Indian Express.

"This is fraud. A lot of students have put in efforts for the examination and the results are unfair especially as the number of students qualifying the NEET UG 2024 examination is quite high in comparison to the past few years. This difference stands in lakhs," Dr Basavaraja explained. While 23,33,297 candidates appeared for NEET this year, around 13,16,268 qualified, as compared to around 11,45,976 candidates in 2023 and around 9,93,069 in 2022. In 2023, two students secured the first rank with a total score of 720 followed by candidates with scores of 716 and 715. In 2022, one student secured the first rank with a total score of 715 followed by the next three ranks with a score of 715. The NEET results announced on June 4 drew criticism after 67 students secured the first rank with a total score of 720/720, followed by candidates who scored 718 or 719, which many said was improbable. "Hence the IAP has demanded a clarification as the NEET UG result press release does not contain the marks obtained of the 1st 100 rankers…just the percentile obtained by these students," Dr Basavaraja said. He pointed out that this was not the practice followed in the previous years. The scorecard contained marks and the percentile scored by the first 50 ranks for that year, respectively. Dr Basavaraja said that in 2022, around four candidates secured 715 marks with the same percentile but there was just one candidate who secured the first rank and the remaining three candidates secured the following ranks. The first rankers in 2021, 2022 and 2023 had a perfect score of 720 followed by the next ranks securing a score of 716 or 715, which is understandable considering the scoring pattern of the NEET UG examination, Dr Basavaraja added. He pointed out that each question contains four marks with the deduction leading to one mark lost for the incorrect answer which is a total loss of five marks per incorrect question.




■ "But surprisingly this year the following ranks had a score total of 718 and 719 which does not fulfil the scoring criteria and makes the testing and evaluation suspicious. The NTA mentions that compensatory marks were allotted on account of loss of time. The examination guidelines do not mention such rules. The allotted compensatory marks have led to an unprecedented increase in the cut-off. This additional rule should have been disclosed before the examination was conducted," Dr Yogesh Parikh, IAP secretary general, said in an official statement released Wednesday.

# अज्ञात भ्रमणध्वनीच्या भडिमाराने नाशिकच्या 'हंप्राठा'तील प्राध्यापक का त्रस्त आहेत ?




● नाशिक: हॅलो, दिल्लीहून बोलतेय, अमूक मॅडमशी बोलायचंय, त्यांना दूरध्वनी द्या... त्यांच्याशी दूरध्वनी जोडला (कॉन्फरन्स) की, त्यांच्या भावाशी बोलायचे आहे.. त्यालाही दूरध्वनी जोडला की, त्याच्या परिचितातील अन्य एखाद्या व्यक्तीशी बोलायचे असल्याचे कारण सांगितले जाते. शहरातील हं.प्रा.ठा. महाविद्यालयातील प्राचार्य आणि प्राध्यापक दोन दिवसांपासून सातत्याने येणाऱ्या अशा अज्ञात फोनमुळे त्रस्त झाले आहेत. महिला प्राध्यापिकेशी बोलायचे कारण देत एकेकास वेगवेगळ्या क्रमांकाहून दिवसभरात १०० ते १५० दूरध्वनी येत असल्याने समस्त प्राध्यापक वर्गाला प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दोन दिवसांपासून वारंवार येणाऱ्या दूरध्वनीच्या जाचामुळे हंप्राठातील प्राचार्य, प्राध्यापक वर्ग हैराण झाला आहे. महाविद्यालयात कार्यरत एका महिला प्राध्यापिकेला प्रारंभी असे काही दूरध्वनी आले होते. दुपारपासून सुरू झालेल्या दूरध्वनीचा भडिमार रात्री उशिरापर्यंत कायम राहिला. या काळात त्यांनी जेव्हा जेव्हा दूरध्वनी घेतला, समोरून मुलीने त्यांच्या भावाचे नाव सांगून त्यांच्याशी बोलायचे असल्याचे कारण दिले. महिला प्राध्यापिकेने भावाला दूरध्वनी जोडल्यावर समोरून त्यांच्या परिचितातील अन्य व्यक्तीचे नाव सांगून त्याच्याशी बोलायचे असल्याचे सांगितले गेले. या प्रकारामुळे प्राध्यापिका चक्रावल्या. नंतर संबंधित प्राध्यापिकेशी बोलायचे आहे, असा महाविद्यालयातील प्राचार्य व इतर प्राध्यापकांना दिल्लीहून भ्रमणध्वनीचा मारा सुरू झाला. काही प्राध्यापकांनी संबंधित महिला प्राध्यापिकेशी दूरध्वनी जोडून दिला असता, आधीसारखा अनुभव आला. एकाचे नाव सांगून नंतर दुसऱ्याशी, मग तिसऱ्याशी बोलायचे कारण समोरून दिले गेले. संबंधितांना या गडबडीत अडकवून ठेवले जात असल्याचा अंदाज आहे. या प्रकारास वैतागलेल्या काही प्राध्यापकांनी अनोळखी भ्रमणध्वनी घेणे बंद केल्यावर वेगवेगळ्या क्रमांकावरून त्यांच्याशी संपर्क साधला जाऊ लागला. मुलीच्या आवाजात दिल्लीहून संपर्क साधणाऱ्यांना प्राध्यापकांची नावे माहिती आहेत. त्यांनी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला तरी दिवसभरात १०० ते १५० भ्रमणध्वनींना तोंड द्यावे लागत आहे. फेसबुकवर एखाद्याची बनावट माहिती टाकून संदेश पाठविण्याचे प्रकार घडत असून तशा तक्रारी येत आहेत. परंतु, एकसारखे अज्ञात भ्रमणध्वनी आल्याचे प्रकार घडल्याच्या तक्रारी आलेल्या नाहीत. संबंधित प्राध्यापकांनी या संदर्भात पोलिसांकडे तक्रार करावी. त्यांना एकसारखे भ्रमणध्वनी करण्यामागे कुणाचातरी खोडसाळपणा असण्याची शक्यता आहे. त्रास देण्याच्या उद्देशाने हे कृत्य केले जात असावे.

**- रियाज शेख (वरिष्ठ निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, नाशिक)**

# Several Delhi museums get hoax bomb threat emails

Delhi - At least six museums in Delhi, including the National Rail Museum, received bomb threats via email on Wednesday morning that were later declared to be hoaxes. The police and the bomb squad reached the locations and scanned the premises after receiving information about the threat.

Deputy Commissioner of Police (New Delhi) Devesh Mahla confirmed that the National Rail Museum in Chanakyapuri had also received the email. The police are now probing the origin of the emails. Over the past couple of months, several bomb hoax emails have been received by hospitals, schools and colleges in Delhi, forcing the authorities to vacate the premises and carry out searches.

All the cases have been clubbed and are being probed by the Counter-Intelligence Unit of the Delhi Police Special Cell, to trace the origin person and country from which the emails have been sent.

Meanwhile, the Mental Health Institute (MHI) in Chandigarh's Sector 32 also received a bomb threat via email on Wednesday morning, following which several patients were shifted to another wing.




# Massive fire at Thane chemical unit; no injuries so far

Mumbai - A massive fire broke out at the manufacturing unit of a chemical company in the MIDC area in Dombivli of Thane district in Maharashtra on Wednesday morning, weeks after 13 people were killed in a boiler blast at a chemical company in the same area.

According to officials, as the fire erupted in a company called Indo Amine at around 10.15 am, four to five fire brigade vehicles were rushed to the spot and personnel are trying to douse the blaze. No casualties have been reported so far. In a video from the spot, a cloud of smoke could be seen in the sky even from a distance. There were unconfirmed reports of minor blasts after the fire broke out. Fearing the fire may spread and trigger blasts in surrounding companies, the local administration is vacating nearby companies and other units. "An unfortunate incident of fire has taken place in Dombivli MIDC again. The government should conduct a fire safety audit of these companies. The government does not seem to have learned anything from the previous incident. Urgent emphasis should be given to relocating such industries. Now the government should come out of the election mode," Leader of Opposition in Maharashtra Legislative Council Ambadas Danve said.



# पवारांच्या राष्ट्रवादीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर; प्रवक्त्याच्या सूचक पोस्टने चर्चांना उधाण

● मुंबई , प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाला महाराष्ट्रात चांगलं यश मिळालं असलं तरी निवडणूक निकालानंतर पक्षातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात आमदार रोहित पवार यांनी कोणत्याही नेत्याचं नाव न घेता पक्षात सुरू असलेल्या काही गोष्टींबाबत आपली नाराजी व्यक्त केली. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या भाषणातून कोणत्याही नेत्याने अंतर्गत गोष्टींवरची भूमिका जाहीरपणे मांडू नये, अशी सूचना केली. या दोन्ही नेत्यांमध्ये अप्रत्यक्षरित्या कलगीतुरा रंगलेला असताना



आता यामध्ये प्रवक्त्यांनीही उडी घेतल्याचं दिसत आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते आणि रोहित पवारांचे विश्वासू अशी ओळख असणाऱ्या विकास लवांडे यांनी ६ जून रोजी एक पोस्ट लिहीत पक्षाच्या प्रदेश पातळीवरील नेतृत्वात खांदेपालट करण्यात यावा, अशी मागणी केली होती. "निष्ठावान, लढाऊ नेते शशिकांत शिंदे आणि युवा आमदार रोहित पवार यांच्यावर प्रदेश संघटनेची मुख्य जबाबदारी देण्यात यावी. तसंच राष्ट्रीय पातळीवर सर्वांना सोबत घेऊन पक्ष संघटना वाढवली पाहिजे," असं लवांडे यांनी म्हटलं होतं. या पोस्टच्या माध्यमातून त्यांनी अप्रत्यक्षपणे प्रदेशाध्यक्षपदावर भाष्य केल्यानंतर आता जयंत पाटील यांच्या गोटातूनही प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

जयंत पाटील यांचे खंदे समर्थक आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते ॲड. भूषण राऊत यांनीही सोशल मीडियावर पोस्ट लिहीत प्रदेशाध्यक्षपदाची मागणी करणाऱ्यांवर अप्रत्यक्षरित्या निशाणा साधला आहे. "राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्षपद सांभाळणे हे कोंबड्या पाळण्याइतके सोप्पे नाही," असा टोला भूषण राऊत यांनी लगावला आहे. रोहित पवार हे बारामती ॲग्रो या आपल्या कंपनीच्या माध्यमातून कोंबड्यांचा व्यवसाय करत असल्याने भूषण राऊत यांनी त्यांना उद्देशूनच हा टोला लगावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे.

जाहीर व्यासपीठावरून जयंत पाटलांनी काय आवाहन केलं?

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून अहमदनगर इथं आयोजित सभेत बोलताना जयंत पाटील म्हणाले की, "माझ्या प्रदेशाध्यक्षपदाचे महिने याआधी अनेकांनी मोजून झाले आहेत. आता पुढचे चार महिने मोजू नका. कारण आता निवडणूक आहे. जाहीरपणे बोलायचे बंद करा. काही तक्रार असेल तर शरद पवार यांना भेटून ती तक्रार करा. त्यावर ते आमच्या दोन कानाखाली मारतील, नाहीतर त्यांना योग्य वाटेल तो निर्णय घेतील. फक्त ट्विटरवर वगैरे बोलणं बंद करा," असं आवाहन पाटील यांनी केलं.

"मी सगळो नीट करतो. पक्ष ही कोणा एकाची संपत्ती नाही, महाराष्ट्रातील लाखो लोकांचा हा पक्ष आहे. मी चुकीचो वागलो तर सगळ्या महाराष्ट्रातील जनतेवर याचा परिणाम होणार, याचं भान ठेवून आपण सगळ्यांनी वागू. पुढील चार महिने आपण एका दिलाने राहू. नोव्हेंबरनंतर मीच प्रदेशाध्यक्ष म्हणून नमस्कार करेन. पण तोपर्यंत जाहीरपणे आणि खासगीतही चर्चा करू नका. काही सूचना असतील तर मला येऊन सांगा. लोकसभेत झालेला विजय हा माझ्या एकट्याचा नाही. हे टीम वर्क आहे. त्यामुळे चिंता करू नका, विधानसभेतही आपल्या बाजूनेच निकाल येईल," असंही जयंत पाटील यांनी म्हटलं आहे.

## सरकार स्थापनेनंतर रेशन कार्ड धारकांसाठी आनंदाची बातमी, घेण्यात आला मोठा निर्णय



● नवी दिल्ली , प्रतिनिधी :

जर आपल्याकडे रेशन कार्ड असेल आणि आपण सरकारकडून मिळणाऱ्या मोफत अथवा स्वस्त रेशन योजनेचा लाभ घेत असाल तर ही बातमी खास आपल्यासाठी आहे. मोदी सरकारने आपल्या तिसऱ्या कार्यकाळात रेशन कार्ड धारकांना मोठा दिलासा दिला आहे. सरकारने आधार आणि रेशन कार्ड लिंक करण्याची तारीख आणखी पुढे ढकलली आहे. यावेळी सरकारने तीन महिन्यांनी मुदत वाढवली आहे. यापूर्वी आधार आणि रेशन कार्ड लिंक करण्याची अंतिम तारीख ३० जून होती. ती आता 30 सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. यासंदर्भातील अधिसूचना अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाने जारी केली आहे.

आधार आणि रेशनकार्ड लिंक करणे का आहे आवश्यक? -

सरकारने 'वन नेशन-वन रेशन कार्ड'ची घोषणा केल्यापासून रेशन कार्ड आधारशी लिंक करणे अनिवार्य केले आहे. एकापेक्षा अधिक रेशनकार्ड असलेले लोक वेगवेगळ्या ठिकाणांवरून मोफत रेशनचा लाभ घेत असल्याची माहिती सरकारला मिळाली आहे. याला आळा घालण्यासाठी रेशन कार्ड आधारशी लिंक करण्यावर भर दिला जात आहे. याशिवाय, अनेक लोक मृत व्यक्तींच्या रेशन कार्डवरही लाभ घेत आहेत. यामुळे गरजू लोकांचे नुकसान होते. असे, सर्व प्रकार थांबवण्यासाठी सरकारने रेशन कार्ड आधारशी लिंक करणे अनिवार्य केले आहे.

यापूर्वीही अनेकवेळा देण्यात आलीय मुदतवाढ -

आधार आणि रेशन कार्ड लिंक करून भ्रष्टाचारला लगाम घालण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. महत्वाचे म्हणजे, रेशन कार्ड आधारला लिंक करण्याच्या अंतिम तारखेला सरकारने यापूर्वीही अनेक वेळा मुदत वाड दिली आहे.

## भ्रष्टाचाराच्या पैशांवरून अधिकाऱ्यांमध्ये जुंपली, जव्हार कृषी विभागात घडला प्रकार



● जव्हार, प्रतिनिधी :

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी कृषी विभागात वाटप करण्यात आला असून, पालघर जिल्ह्यात हा निधी फक्त कागदावरच असल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, जव्हार कृषी विभागात त्यात मोठा भ्रष्टाचार उघड झाला असून, भ्रष्टाचाराचे पैसे कृषी अधिकाऱ्याला मिळाले नसल्याने तालुका कृषी अधिकारी आणि कृषी अधिकाऱ्यांचा वाद चव्हाट्यावर आला आहे. या वादाचे व्हिडीओ 'लोकमत'च्या हाती लागले आहेत. जव्हार तालुक्यात कृषी विभागात एक तालुका कृषी अधिकारी, दुसरे कृषी अधिकारी तसेच मंडळ अधिकारी-१ व मंडळ अधिकारी-२ अशी पदे आहेत. त्यामध्ये कृषी अधिकाऱ्याला बायपास करून देयके अदा करण्यात आल्याने व त्याला वाटा मिळाला नसल्याने दोघा अधिकाऱ्यांमधील वाद उफाळला आहे. भ्रष्टाचाराचे पैसे दोघांमध्ये बरोबर वाटप झाले नसल्याने दोघांत कडाक्याचे भांडण होत असून, दोन्ही अधिकारी एकमेकांवर ताशेरे ओढत असल्याचा व्हिडीओ हाती आला आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान महाराष्ट्रात राबविले जात असून कृषी आयुक्तांनी कृषी विभागास २०२२-२३ साठी ३७६२.५८० लाख निधी मंजूर केला आहे. २०२३-२४ साठी १६४७५.७७५ लाख निधी मंजूर करण्यात आलेला असून ३१ जिल्ह्यांची निवड करण्यात आलेली आहे.

वाटा मिळाला नसल्यामुळे बाचाबाची

- जव्हारचे तालुका कृषी अधिकारी दीपक सोमवंशी यांनी स्वत: व मंडळ कृषी अधिकारी-१ जयराम आढळ व मंडळ कृषी अधिकारी-२ संजीव गोसावी यांनी 'पेड बाय मी' देयके सादर केल्यामुळे कार्यालयातील कृषी अधिकारी वसंत नागरे यांनी 'पेड बाय मी'मध्ये त्यांचे नाव नसल्याने त्यांना वाटा मिळाला नाही.

## राम मंदिराची अभेद्य सुरक्षा अयोध्येत बनणार NSG हब, ब्लॅक कॅट कमांडो तैनात होणार!

● अयोध्या, प्रतिनिधी :

राम मंदिरामुळे अयोध्येचे देशात आणि जगात स्वत:चे वेगळे स्थान आहे. अशा परिस्थितीत अयोध्येतील सुरक्षेसाठी विविध व्यवस्था करण्यात आल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आता रामनगरीमध्ये एनएसजी (National Security Guard) हब तयार करण्यात येणार आहे. दहशतवादाचा धोका आणि त्याचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. अयोध्येत तयार होणाऱ्या एनएसजी हबमध्ये ब्लॅक कॅट कमांडो तैनात करण्यात येणार आहेत.

गृह मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एनएसजीला



अयोध्येतील दहशतवादविरोधी आणि अपहरणविरोधी कारवायांची विशिष्ट जबाबदारी देण्यात येणार आहे, ज्याचे काम एनएसजी खूप चांगले करत आहे. अयोध्येत एनएसजी हब स्थापन करण्याच्या दिशेने सरकार वेगाने काम करत आहे. अयोध्येतील राम मंदिराची सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्याची तयारी सुरू आहे.

अशा परिस्थितीत आता एनएसजीची तुकडी अयोध्येत तैनात करण्यात येणार आहे. अयोध्येच्या सुरक्षेची संवेदनशीलता लक्षात घेऊन ब्लॅक कॅट कमांडो तैनात करण्यात येणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. आतापर्यंत राम मंदिराच्या सुरक्षेसाठी तैनात असलेले पीएसी जवान दर दोन महिन्यांनी बदलले जात असल्याची माहिती आहे. राम मंदिराच्या सुरक्षेसाठी पीएसीच्या आठ कंपन्या यूपी एसएसएफला देण्यात आल्या आहेत. एटीएसची तुकडी सुद्धा अयोध्येत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सध्या व्हीआयपी सुरक्षेसाठी तैनात असलेल्या एनएसजीच्या व्हीआयपी सुरक्षा युनिटकडून ही जबाबदारी पूर्णपणे काढून घेऊन सीआरपीएफच्या व्हीआयपी सुरक्षा युनिटकडे सोपवण्याची तयारी सुरू आहे. संसदेच्या सुरक्षा कर्तव्यातून मुक्त झाल्यानंतर सीआरपीएफच्या संसद कर्तव्य गटाला (PDG) आता व्हीआयपी सुरक्षेसाठी तैनात केले जाऊ शकते. याबाबत गृहमंत्रालयात बैठकांच्या अनेक फेऱ्या झाल्या असून, लवकरच याबाबत निर्णय होऊ शकतो. दरम्यान, एनएसजी सध्या ९ व्हीआयपींना सुरक्षा पुरवत आहे. एनएसजीच्या व्हीआयपी सुरक्षा युनिट, स्पेशल रेंजर ग्रुपचे (SRG) कर्तव्य पूर्णपणे सीआरपीएफच्या व्हीआयपी सुरक्षा युनिटकडे सोपवण्याची योजना आहे.

## दारव्हा तालुक्यात ९५ वर्गखोल्या दुरुस्तीच्या प्रतीक्षेत

● दारव्हा , प्रतिनिधी :

तालुक्यात ३४ पेक्षा जास्त शाळांची पडझड झाली आहे. त्यामधील ९५ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असून, या कामाला कधी मंजुरी मिळेल, याची प्रतीक्षा आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थी संख्या वाढवायची असेल तर शाळांतील सुविधांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विविध सुविधांचा अभाव असल्याचे दिसून येते. दुरुस्तीसोबतच ७१ नवीन वर्गखोल्या, वर्गखोल्या. १२६ स्वच्छतागृहे तसेच १२ हजार ५११ रनिंग मीटर सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. आजकाल शिक्षणाकरिता अनेकांचा कल शहराकडे जास्त आहे. त्यातही इंग्रजी माध्यमांच्या शाळेत आपला मुलगा शिकावा अशी प्रत्येक पालकाची अपेक्षा वाढत चालली आहे. त्यासाठी शैक्षणिक खर्च करण्याची पालकांची तयारी आहे.



आधुनिक शिक्षण, विविध प्रकारच्या सुविधा, हे यामागचे कारण आहे. त्यामुळे दिवसेंदिवस जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या रोडावत चालली आहे. तरीसुद्धा पालकांची आर्थिक परिस्थिती, काही ठिकाणी मिळत असलेले चांगले शिक्षण यासह इतर कारणांमुळे या शाळांमध्ये काही विद्यार्थी आजही टिकून आहेत. ही जिल्हा परिषद शाळांची जमेची बाजू आहे. या बाबींचा विचार करता तेथील विद्यार्थ्यांना अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १३५ शाळा आहेत. तेथील विद्यार्थ्यांना चांगल्या वर्गखोल्या, शौचालय आदींसह आवश्यक सोयीसुविधा मिळत नाहीत. काही ठिकाणी तर शाळा पडण्याच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वर्गखोल्यांना भरपूर कालावधी झाल्याने तसेच अतिवृष्टी, पुरामुळे पडझड झाली. यासंदर्भात स्ट्रक्चरल ऑडिट करून बांधकाम विभागाच्या प्राकलन रकमेसह जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानंतर वर्गखोली निर्लेखनास मंजुरी देण्यात आली. पडक्या वर्गखोल्या पाडायला परवानगी तर मिळाली. मात्र, निधी प्राप्त झाला नाही. त्यामुळे त्या वर्गखोल्या पाडण्यात आल्या नाहीत. आता यूडायसच्या संकलनातून सुविधांच्या अभावाबाबतची माहिती समोर आली आहे. शिक्षण विभागाने ९५ वर्गखोल्यांची दुरुस्ती, ७१ नवीन वर्गखोल्या, मुली व मुलांसाठी मिळून १२६ स्वच्छतागृहे तसेच १२ हजार ५११ रनिंग मीटर सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक असल्याबाबत वरिष्ठांना कळविले आहे. आता या प्रस्तावाला केव्हा मंजुरी मिळणार, याकडे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

## कोल्हापूरमध्ये आढळला 'पांढरा चिकटा'; डॉ. मकरंद ऐतवडे यांचे संशोधन

● कोल्हापूर, प्रतिनिधी :

कोल्हापूर शहरातील वृक्षसंपदेचा अभ्यास करताना वनस्पती अभ्यासक डॉ. मकरंद ऐतवडे यांना हॉर्स बूश अर्थात पांढरा चिकटा हा छोटेखानी वृक्ष मंगळवार पेठेतील दत्त कॉलनी येथे प्रकाश चव्हाण यांच्या घराजवळ आढळून आला. चव्हाण यांनी दोन वर्षापूर्वी नर्सरीमधून हा छोटेखानी वृक्ष आणून लावला होता. वृक्ष डॉ. ऐतवडे यांनी सायबर कॉलेजमध्ये देखील पाहिल्याचे सांगितले आहे. हा वृक्ष मूळचा ऑस्ट्रेलिया खंडातील असून तो आफ्रिका, आशिया आणि पॅसिफिक आयलँड्स या भागातही पाहावयास मिळतो. हॉर्स बूश या वृक्षाचे शास्त्रीय





नाव डेन्ड्रोलोबीयम अंबेल्याटम असे आहे. डेन्ड्रोलोबीयम या जातीचा अर्थ पुढील प्रमाणे आहे. डेन्ड्रॉस म्हणजे ट्री अर्थात वृक्ष आणि लोबीयम म्हणजे शेंगाधारी. याच्या प्रजातीस उच्छत्र (अंबेल) प्रकारच्या फुलोऱ्यावरून अंबेल्याटम हे नाव दिले गेले आहे. पांढरे फुल असलेल्या या झाडाच्या च्या शेंगा कपड्यांना चिकटतात त्यामुळे पांढरा चिकटा असे स्थानिक नाव पडले असावे. जगभरात डेन्ड्रोलोबीयमच्या सुमारे १८ प्रजाती पहावयास मिळतात. त्यापैकी डेन्ड्रोलोबीयम अंबेल्याटम हि एकमेव प्रजात समुद्रकिनारी वाढणारी आहे.

कसा असतो वृक्ष?

या वृक्षाची नोंद महाराष्ट्र राज्याच्या वनस्पती कोशामध्ये असून कोल्हापूर जिल्ह्याच्या वनस्पती कोशामध्ये याची नोंद नाही. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यासाठी प्रथमच पांढरा चिकटा या वृक्षाची नोंद होत आहे. हा वृक्ष साधारणपणे ९ ते १२ फूट उंच वाढतो. याची साल राखाडी रंगाची असते. या झाडाची पाने पोपटी रंगाची आणि संयुक्त असून ती त्रिपर्णी असतात. टोकाकडील पर्णिका अंडाकृती असून बाजूच्या दोन पर्णिका थोड्या निमुळत्या असतात. फुलोरा पानांच्या बेचक्यात येत असून फुले पांढऱ्या रंगाची करंजीच्या फुलांप्रमाणे असतात.

## मायणीचे प्राध्यापक देणार आर्यलॅंडमध्ये मेडिकलचे धडे!



● सातारा, प्रतिनिधी :

ज्या विद्यापीठाची फेलोशिप मिळविण्यासाठी आणि एकदा तरी तेथील वैद्यकीय शिक्षणाचा अनुभव घेण्यासाठी हजारो डॉक्टर जीवाचे रान करतात अशा प्रख्यात विद्यापीठात अध्यापनासाठी आंतरराष्ट्रीय स्पर्धा आणि मुलखतीद्वारे अनेक देशांतील शंभरहून अधिक जागतिक शास्त्रज्ञांमधून मायणी येथील डॉ. नानासाहेब थोरात यांची सहयोगी प्राध्यापक पदी निवड करण्यात आली आहे. सप्टेंबरपासून डॉ. थोरात रॉयल कॉलेजमध्ये फिजिओलॉजी मेडिकल फिजिक्स आणि मेडिसिन विभागामध्ये एमबीबीएस आणि एमडीच्या विद्यार्थ्यांना न्यूरोसायन्स आणि ब्रेन कॅन्सर या विषयाचे अध्यापन करणार आहेत.

आयर्लंड येथील तीनशे वर्षे जुन्या रॉयल कॉलेज ऑफ सर्जन या मेडिकल विद्यापीठात तीनशे वर्षे जुने असून इथे जगातील शंभर देशातून तीन हजार डॉक्टर्स दरवर्षी शिक्षण घेतात. आंतरराष्ट्रीय पीएचडी प्रोग्रॅम अंतर्गत लहान मुलांमधील ब्रेन कॅन्सर, स्त्रियांमधील ब्रेस्ट आणि ब्रेन कॅन्सरवरती संशोधन करणाऱ्या चार पीएचडी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून डॉ. थोरात जबाबदारी पार पाडणार आहेत. विद्यापीठात फक्त दोनच भारतीय प्राध्यापक आहेत. तीनशे वर्षाच्या विद्यापीठाच्या इतिहासात डॉ. थोरात यांच्या रूपाने पहिल्यांदाच एका मराठी व्यक्तीला तेथे प्रोफेसर पदाची संधी मिळाली आहे.

## चारही सभागृहात जाण्याचा नारायण राणेंनी मिळविला सन्मान, राज्यातील सहावे नेते

● सिंधुदुर्ग, प्रतिनिधी :

रत्नागिरी-सिंधुदुर्गलोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी लोकसभा निवडणुकीत विजय मिळवून देशातील चारही सभागृहांमध्ये निवडून येण्याचा मान मिळविला आहे. यापूर्वी असा मान राज्यातील पाच माजी मुख्यमंत्र्यांनी मिळविला होता. यात राणे आता सहाव्या क्रमांकावर आले आहेत. माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेसचे दिवंगत नेते शंकरराव चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे आमदार पृथ्वीराज चव्हाण, शिवसेना नेते तथा लोकसभेचे माजी अध्यक्ष दिवंगत मनोहर जोशी आणि भाजपाचे राज्यसभा सदस्य अशोक चव्हाण यांनी अशा प्रकारे चारही सभागृहात जाण्याचा मान मिळविला होता. आता यात राणेंची भर पडली आहे.

त्यामुळे ते तब्बल २४ वर्षे विधानसभा सदस्य होते. त्यानंतर २०१७ साली त्यांनी काँग्रेस पक्षाकडून विधान परिषद निवडणूक लढवून ते विधान परिषदेच्या सभागृहात काही काळ आमदार होते. २०२१ साली भाजपा प्रवेशानंतर त्यांना राज्यसभेवर



खासदार करण्यात आले, तर तत्कालिन मोदी सरकारमध्ये ते सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगमंत्री होते. राणे २००५मध्ये शिवसेनेतून बाहेर पडल्यावर ते काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यांचा आघाडी सरकारमध्ये महसूल मंत्री म्हणून समावेश झाला. राणे यांचा २०१४ विधानसभा निवडणुकीत कुडाळ मतदारसंघातून पहिला पराभव झाला. २०१७मध्ये राणे यांनी महाराष्ट्र स्वाभिमानी पक्षाची स्थापना केली. हा पक्ष त्यांनी १५ ऑक्टोबर २०१९मध्ये भारतीय जनता पक्षामध्ये विलीन केला.

महाराष्ट्राचे अल्प कालावधीसाठी मुख्यमंत्री राणे यांनी विसाव्या वर्षी शिवसेनेत प्रवेश केला. चेंबूर येथे स्थानिक शाखाप्रमुख म्हणून त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. त्यानंतर ते महापालिकेमध्ये नगरसेवक झाले. सन १९९० मध्ये तत्कालिन कणकवली - मालवण मतदारसंघातून पहिल्यांदा आमदार झाले. भाजप - शिवसेना युती सरकारच्या काळात राणेंना प्रथम महसूल मंत्रालय मिळाले. १९९९मध्ये फेब्रुवारी ते ऑक्टोबर असे ९ महिने ते राज्याचे मुख्यमंत्री होते. ठाकरे आणि राणे यांच्यातील संबंध बिघडल्यानंतर २००५मध्ये ते पक्षाबाहेर पडले होते.

मूर्ती लहान पण कीर्ती महान

मूर्ती लहान पण कीर्ती महान असे वर्णन नारायण राणे यांचे करता येईल. राजकारणात त्यांनी सक्षम नेतृत्व केले. ते माध्यमात कायम चर्चेत असतात. त्यांची कारकीर्द एक शिवसैनिक म्हणून सुरू झाली. नगरसेवक ते मुख्यमंत्री आणि आता केंद्रीय मंत्री असा त्यांचा प्रवास आहे. या काळात त्यांनी शिवसेना, काँग्रेस, स्वाभिमानी पक्ष, भाजप असा पक्षबदलही केला. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी आपला राजकीय प्रवास सुरू केला.

## पवन कल्याणनं घेतली आंध्र प्रदेशच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ, चिरंजीवीचा घेतला आशीर्वाद

● मुंबई, प्रतिनिधी :



तेलगू देसम पक्षाचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू यांनी आज १२ जून रोजी आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. चंद्राबाबू नायडू हे चौथ्यांदा आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री बनले आहेत. त्याचबरोबर दक्षिण चित्रपटसृष्टीतील 'पॉवर स्टार' म्हणून ओळखले जाणारे आणि जनसेना पक्षाचे अध्यक्ष पवन कल्याण यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, परिवहन मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक राजकीय आणि चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांनी या शपथविधी सोहळयाला हजेरी लावली. यावेळी पवन कल्याणच्या मेगास्टार कुटुंबानंही शपथविधीला हजेरी लावली होती.

उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर, पवन कल्याण यांनी पंतप्रधान मोदी, राज्यपाल एस अब्दुल नजीर, सुपरस्टार रजनीकांत यांना अभिवादन केलं आणि त्यानंतर मंचावर उपस्थित असलेले त्यांचे मोठे भाऊ चिरंजीवी यांच्या चरणांना स्पर्श केला आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. पवन कल्याण उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत असताना त्यांची परदेशी पत्नी ॲना लेझनेवा हा खास क्षण आपल्या कॅमेऱ्यात कैद करत होत्या.

शपथविधी सोहळ्याला मेगास्टार परिवारासह रजनीकांतची उपस्थिती

पवन कल्याण यांचे संपूर्ण कुटुंब आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या शपथविधी सोहळयाला हजर होते.